# गंधराणी

(मिश्र कवितासंग्रह - भाग १)

रचना

**डॉ. मंजूषा कुलकर्णी**

(साहित्य अकादमी पुरस्कारप्राप्त लेखिका, कवयित्री)

मंजुभारती प्रकाशन

**पुणे**

**गंधराणी** (मिश्र कवितासंग्रह - भाग १)

**रचना** : डॉ. मंजूषा कुलकर्णी
(साहित्य अकादमी पुरस्कारप्राप्त लेखिका, कवयित्री)
साकेत / २५, जयवंत पालकर मार्ग,
पोद्दार रुग्णालयासमोर वरळी, मुंबई - ४०० ०३०.
भ्रमणध्वनी - ९०८२१६१५२४, ९८२२८३९४९१
Email : drmangushak@gmail.com

**कायमस्वरूपी पत्ता :** २३१, समर्थ अलंकार, फ्लॅट-२,
कवितांच्या बागेसमोर, ज्योतीनगर,
छत्रपती संभाजीनगर - ४३१ ००५.

**प्रकाशक** : सौ. उल्का मंगेश कुलकर्णी
**मंजुभारती प्रकाशन**
'अे' ५०४, महालक्ष्मी पॅलेस,
वेंकटेश शर्विल सोसायटी समोर,
सी.एन.जी. पंपासमोर, पारी कंपनी चौक,
नऱ्हे, पुणे - ४११०४१.

**प्रथम आवृत्ती** : ज्येष्ठ शु. सप्तमी, शके १९४७
सोमवार, दि. ०२ जून, २०२५

**अक्षर जुळवणी** : सौ. अनिता विनायक भालेराव
क्रिएशन,
जयश्री, १-एन, सेक्टर ए, एन-१,
सिडको, छत्रपती संभाजीनगर - ४३१००३.
भ्रमणध्वनी - ९४२३३ ९६८८१

**मुद्रक** : स्टार कॉपीयर्स प्रायव्हेट लिमिटेड
कुमठेकर मार्ग, सदाशिव पेठ, पुणे ३०

**ISBN** : 978-81-987974-1-4

**सर्वाधिकार** : © लेखिकेच्या स्वाधीन

**किंमत** : ₹ २००/-

सर्व रसिकवरांना
सादर समर्पण...

# मनोगत

कविता ही माझ्यासाठी फक्त अभिव्यक्ती नाही, ती माझ्या आत्म्याचा श्वास आहे. ‘गंधराणी‘ हे माझं असंच एक अतिशय जिव्हाळ्याचं स्वप्न आहे. या संग्रहातील प्रत्येक कविता ही माझ्या मनातील एखाद्या सुगंधाची आठवण आहे. कधी निसर्गाची, कधी नात्याची, कधी प्रेमाची, कधी मौनाची. हा संग्रह ‘मिश्र’ आहे. कारण जीवनही मिश्र आहे. या कवितांमध्ये मी कोणताही विषय ठरवून लिहिलेला नाही. त्या जशा आल्या, तशाच उमलल्या. काही कविता पावसातल्या त्या पहिल्या थेंबासारख्या झरल्या, काही उन्हातल्या कोमेजलेल्या क्षणांत जन्मल्या, तर काही वाऱ्याच्या झुळुकीसोबत सहज उमलल्या. पण सगळ्या कवितांत एकच गंध आहे मनाचा.

माझ्या लेखनप्रवासात मला मिळालेला High Range Book of World Records चा सन्मान हा माझ्या प्रत्येक शब्दासाठी दिलेला आशीर्वाद आहे. माझ्या मराठी भाषेवरील प्रेमाची ही साक्ष आहे. माझ्या लेखनाला ही जागतिक मान्यता मिळाली, ही माझ्यासाठी अभिमानाची बाब आहे, पण त्याहून अधिक ती प्रेरणेची आहे. प्रत्येक नवीन कविता लिहिताना मी ही मान्यता आठवते आणि मनात एक नवी निष्ठा जागते.

‘गंधराणी’ या संग्रहात मी माझं जग उलगडलं आहे. कधी मी प्रेमात हरवले, कधी मी निसर्गाच्या कुशीत विसावले, कधी समाजाच्या प्रश्नांवर विचार केला, तर कधी स्वतःशीच संवाद साधला. काही कविता रडत उमटल्या, काही हसत, काही पूर्ण मौनात. पण त्या सगळ्या माझ्याच आहेत. माझ्या आतल्या गंधाच्या शोधातल्या.

या संग्रहाचं नाव मी ‘गंधराणी’ ठेवलं कारण मला वाटलं, जीवनात प्रत्येक भावनेला एक गंध असतो. आनंदाचाही, विरहाचाही, शांततेचाही, संघर्षाचाही आणि प्रत्येक मनात एक राणी असते जी या साऱ्या गंधांची अधिष्ठात्री असते. माझ्या या कवितांत तीच राणी बोलते, कधी हळू आवाजात, कधी झुळुकीसारखी स्पर्शून, तर कधी ओघळत्या अश्रूतून.

मी कधी कधी विचार करते, कविता खरं तर मी लिहिते का? की त्या स्वतः माझ्या अंतर्मनातून उमलतात? मला वाटतं, त्या आपोआप जन्म घेतात. जसा फुलाचा गंध स्वतः उमलतो, तसा. मी फक्त माध्यम असते. माझ्या भावनांनी आकार घेतलेले हे शब्द जेव्हा वाचकाच्या हृदयापर्यंत पोहोचतात, तेव्हाच कविता पूर्ण होते. वाचक हा माझ्या कवितेचा सहनिर्माता आहे.

'गंधराणी' तयार करताना मी प्रत्येक कवितेला पुन्हा जगले आहे. काही कविता जुने दिवस परत घेऊन आल्या, काही नव्या संवेदनांचा स्पर्श देऊन गेल्या. मला वाटतं, या सगळ्या कवितांनी मिळून माझ्या मनाचं एक गंधमंदिर उभं केलं आहे. या संग्रहाचा वाचक जेव्हा पानं उघडेल, तेव्हा त्याला कुठेतरी आपलंच मन सापडेल. त्याला काही ओळींत स्वतःचा गंध जाणवेल. त्याचं स्मित, त्याचे अश्रू, त्याचे विचार, सगळं या कवितांमध्ये मिसळून जाईल. हा संग्रह मी म्हणून लिहिलेला असला, तरी तो प्रत्येकासाठी आहे. कविता ही माझ्यासाठी 'स्व' आणि 'विश्व' यांच्यातला सेतू आहे. या संग्रहातून जर तो पूल थोडासा जरी वाचकांच्या मनात उभा राहिला, तर माझं लेखन सार्थक झालं असं मी मानेन.

'गंधराणी' माझ्यासाठी केवळ शब्दांचा नाही, तर गंधांचा प्रवास आहे. हा प्रवास चालूच राहील. प्रत्येक वाचकाच्या मनात, प्रत्येक नव्या ओळीत, प्रत्येक अनुभूत क्षणात.

हे पुस्तक मी त्या सर्वांना अर्पण करते ज्यांनी माझ्या कवितांना आपलं हृदय दिलं, ज्यांच्या नजरेतून मला नवीन अर्थ मिळाला आणि ज्यांच्या प्रेमातून मला लेखणीला सुगंध मिळाला.

**डॉ. मंजूषा कुलकर्णी**

# प्रस्तावना

कविता म्हणजे सुगंध. दिसत नाही, पण जाणवते; शब्दांच्या पलीकडील गंध जी मनाला हलकेच स्पर्शून जाते. कवयित्री डॉ. मंजूषा कुलकर्णी यांचा नवीन कवितासंग्रह 'गंधराणी' हा अशा अदृश्य गंधांचा सोहळा आहे. या संग्रहातील कविता म्हणजे भावना, विचार, निसर्ग आणि जीवन यांच्या विविध छटांतून पसरणाऱ्या सुगंधांची नाजूक साखळी आहे. या संग्रहाचं नावच स्वतःचं काव्य आहे गंधराणी.

'गंध' म्हणजे जाणिवेचा शुद्ध गाभा आणि 'राणी' म्हणजे त्या सुगंधाची अधिष्ठात्री. या दोन्ही शब्दांचा संगम म्हणजे कवयित्रीचं मन. मंजूषाताईंच्या कवितांचा आत्मा हाच आहे. न दिसणारा पण खोलवर भासणारा.

हा संग्रह विविध विषयांवरील आहे. कधी प्रेमाचा ओलावा, कधी विरहाचा धुरकट रंग, कधी निसर्गातील शांत सौंदर्य, कधी समाजातील हलक्याफुलक्या निरीक्षणांची मांडणी. गंधराणी या सर्व भावनांचा सुगंध सामावून घेते. म्हणून हा संग्रह 'मिश्र' म्हणावा लागेल; परंतु ही मिश्रता विस्कळीत नाही. उलट ती एका सुवासिक बंधनात बांधलेली आहे. प्रत्येक कविता जणू वेगवेगळ्या फुलांचा सुगंध घेऊन आली आहे, पण त्या साऱ्या फुलांनी मिळून एक सुंदर गंधमाला तयार केली आहे.

कवयित्रीच्या शब्दांना नेहमीच भावनांचा स्पर्श असतो. त्या जेव्हा लिहितात, तेव्हा त्यांच्या शब्दांत मनाच्या ओलावा उतरतो. त्यांच्या कवितांमध्ये कृत्रिमतेचा स्पर्श नाही. तिथे केवळ अनुभवांची प्रामाणिकता आहे. त्यांच्या लेखणीने जेव्हा 'प्रेम' लिहिलं, तेव्हा तो प्रेमाचा आदर आहे; जेव्हा 'दुःख' लिहिलं, तेव्हा तो वेदनेचा स्वीकार आहे. त्या प्रत्येक भावनेला नाव देतात, रूप देतात आणि मग त्यात वाचकाला आमंत्रण देतात.

'गंधराणी' या संग्रहातील प्रत्येक कविता हे एक स्वतंत्र विश्व आहे. काही कविता शब्दांत मंद वारा वाहतात, काहींमध्ये पावसाचा आवाज आहे, काहींमध्ये उन्हाची झळ आहे, तर काहींमध्ये रात्रभर जागणाऱ्या चंद्राची शांतता. पण त्या सगळ्या कवितांच्या मागे आहे एकच संवेदना. मानवतेची, सौंदर्याची आणि आत्मशोधाची.

डॉ. मंजूषा कुलकर्णी यांनी आपल्या सातत्यपूर्ण आणि गहन काव्यलेखनातून मराठी साहित्यविश्वात आपली स्वतंत्र ओळख निर्माण केली आहे. त्यांच्या लेखणीचा गौरव High Range Book of World Records मध्ये नोंद झालेला आहे आणि ती नोंद ही केवळ एक मान्यता नाही, तर त्यांच्या कवितेच्या तेजाची साक्ष आहे. ही गौरवशाली नोंद म्हणजे मराठी कवितेच्या सामर्थ्याचा जागतिक स्वीकार.

'गंधराणी' हा त्याच तेजाचा पुढचा टप्पा आहे. या कवितांतून त्या स्वतःकडे, समाजाकडे आणि निसर्गाकडे पाहतात. त्यांच्या दृष्टिकोनात करुणा आहे, पण ती दीनतेची नाही. ती समजुतीची आहे. त्या जगाकडे प्रेमाने, पण प्रगल्भतेने पाहतात. म्हणूनच त्यांच्या कवितांमध्ये भावुकता असूनही ठाम विचार आहे.

कवयित्रींच्या लेखनात स्त्रीमनाचं दर्शनही नेहमी उमटतं. पण ते स्त्रीपुरुष विभाजनातून नव्हे तर मानवी संवेदनांच्या सामायिकतेतून येतं. त्या स्त्रीला शक्ती म्हणून, करुणा म्हणून, निर्मितीशक्ती म्हणून आणि कधी आत्मशोधी चेतना म्हणून व्यक्त करतात. त्या शब्दांमधून स्त्री म्हणजे 'गंधराणी'च बनते. दिसत नाही पण प्रत्येक क्षणाला जाणवते.

या संग्रहातील कवितांची भाषा साधी आहे, पण तिचं सौंदर्य गहन आहे. शब्दांची मांडणी ओघवती आहे, उपमा नाजूक आहेत. त्या शब्दांच्या मऊशार गंधात वाचक हरवून जातो. काही ओळी इतक्या अंतर्मुख करतात की त्या वाचकाच्या मनात बराच काळ घुमत राहतात.

कवयित्रीच्या 'गंधराणी' मध्ये प्रेम, नाती, ऋतू, रंग, आशा, निराशा, श्रद्धा, काळ आणि आत्मसंवाद या सर्व विषयांचा स्पर्श आहे. म्हणूनच हा संग्रह 'विविधतेचा सुगंध' आहे. त्या कवितांमधून निर्माण होणारा एकत्रित सुगंध

वाचकाच्या मनात दीर्घकाळ टिकतो. ही कविता म्हणजे केवळ अनुभवांची अभिव्यक्ती नाही. ती जीवनावरील गूढ प्रेमाची साक्ष आहे आणि म्हणूनच या कवितासंग्रहाचे नाव 'गंधराणी' इतके अचूक आणि भावसंपन्न वाटते.

हा संग्रह म्हणजे डॉ. मंजूषा कुलकर्णी यांच्या कवितेच्या गाभाऱ्यातील सुगंधित प्रवास. जिथे शब्द फुलांसारखे उमलतात आणि भावना वाऱ्यासारख्या वाहतात.

**श्री. विलास परब**
बालमोहन विद्या मंदिर
मुंबई

# सारांश

कविता हे आत्म्याचं गीत असतं, ते स्वर्गीय संगीत असतं. प्रतिभेचा हात धरून ते कविहृदयातून अवतरतं. तो शब्दांचा साज, तो भावनांचा बाज, त्या अमूर्त रसागरातील कल्लोलांचा गाज, सारंच कसं मोहवणारं असतं.

माझा अनुभव असा की ठरवून लिहिता येत नसतं, ते आपोआप स्फुरतं, ओंजळीत उरतं. मग साठवावं लागतं त्याला हृदयाच्या अत्तरकुपीत सदोदित दरवळण्यासाठी.

माझ्या कविता ह्या अशाच अलगद उतरलेल्या, क्षणात मंतरलेल्या, झणी बिलगलेल्या, मनी उमगलेल्या. कळ्या होत झर्रर्रकन फुलांचे हिंदोळे घेणाऱ्या, माझ्याच ओटीत सुखाचे दान देणाऱ्या. माझ्या कविता आनंदाचे आंदण देत, शब्दांपलीकडले गोंदण गोंदणाऱ्या.

त्यांना न विषयाचे बंधन न दुःखाचे क्रंदन. वेदनेलाही फुंकर घालत संवेदना करणाऱ्या, माझ्या कविता.

कधी निसर्ग, कधी अळुमाळू फुलं, कधी झाडं, वेली, पानं, कधी एकांतीचं गाणं.

कधी मानवी भाव, कधी अचेतनाला चेतनाचा आव, कधी उगाच कृष्णाचे नाव.

माझ्या कवितेत माणूस, निसर्ग, चराचर, भाव-भावना, नवरस, आनंद, दुःख, प्रीत, विरह, गावाकडची नाती, हुळहुळणारी माती, ग्रामीण ढंग, पावसाचा संग, ऋतूंचा नाच, पारदर्शी काच, मृद्गंध, अजोड बंध, बिंब, प्रतिबिंब, ओलाव्याने चिंब, ग्रीष्म्याचा दाह, खळखळणारा प्रवाह, शरदाचे चांदणे, रात्रीचे सांगणे, पहाटेची गोड मिठी, स्वप्नं गुलाबी किती आणि सारे भाव माझ्या सांगाती.

माझी कविता, ती कधी ओवी, कधी अभंग, कधी पोवाडा, कधी आरती संग, कधी गोंधळ ती कधी लावणी, कधी भावरचना नि विरहिणी, कधी सृष्टीची

ओढून झूल, कधी दऱ्या नि डोंगर भूल, झोळीतले कधी लोभस मूल, कधी इवलुसे होते फूल.

कधी बालकविता, कधी विडंबन, कधी चारोळ्या, कधी तत्त्वज्ञानाचे मंडन, जीवनचिंतन तर कधी मुक्त ती, कधी छंदिष्ट, कधी परमेष्ट, बरेचदा ती लयीत उतरे, नाद तिचा रसिकांस भुलवी रे, कधी आतली, कधी बाहेरची, कधी घरातील, उंबऱ्यातली. कधी माहेरची, कधी सासरची, कधी एकटी, कधी गजबजलेली.

**चाले निरंतर व्रत हे माझे, क्षणोक्षणी प्रत्यूषा**
**मला न कळते, कवितेची मी की कविता मंजूषा**

धन्यवाद.

**डॉ. मंजूषा कुलकर्णी**
साकेत २५, जयवंत पालकर मार्ग,
पोद्दार आयुर्वेदिक रुग्णालयासमोर,
वरळी, मुंबई ४०००३०.
संपर्क : ९०८२१६१५२४ / ९८२२८३९४९१ (W-App)
मेल : dr.manjushak@gmail.com

# अनुक्रमणिका


१. दे दिलासा रे मना ... १५
२. कधी थेंब हा ... १६
३. पालवी ... १७
४. हृदयमंजिरी ... १८
५. मिठीत विरघळल्या तू पावसा ... १९
६. चांदण्याचा भास हा ... २०
७. मी गुलाबाचे ग राणी फूल व्हावे ... २१
८. किती वाट म्या पहावी ... २२
९. वसा कुंभाराचा घ्यावा ... २४
१०. तुला सौख्य देते सदा मी अजुनही ... २६
११. तुझा गंध माझ्या गे श्वासी उरावा ... २७
१२. गाठू म्हायेर पंढरी ... २८
१३. अभंगवाणी ... २९
१४. मूक भांडले अश्रू ... ३०
१५. सुंदर असते मन रुपडे ... ३१
१६. मन चांदवा होताना ... ३२
१७. अर्पियले मी मज तुजसी... ३३
१८. धुन माझी जी अधुरी ... ३४
१९. शब्द सारे शांत झाले ... ३५
२०. गूज आपुले पाऊस होणे... ३६
२१. घर माझे रे तुझेच काळीज. ३७
२२. म्हणूनही मी बरसून जातो... ३८
२३. माय बाप विठुराया। ... ३९
२४. तुझ्या सांडण्याला नको भेदभाव ... ४०
२५. असा दे किनारा ... ४१
२६. मीही नव्याने तुला रोज भेटे ... ४२
२७. अतूट नाते तुझे नि माझे... ४३
२८. मुठीत काळाला धरलं ... ४४
२९. राहीन सदैव कृतज्ञ त्याला ४५
३०. मन सुंदर तर विश्वची सुंदर ४६
३१. परमेशाचे देणे सुंदर ... ४७
३२. पदर अमूल्य ग किमतीला ४८
३३. हृदयाकाशी प्रकाश ... ४९
३४. दोन धुक्यांनी ..: ५०
३५. प्रेमाची शिदोरी वेगळी गं ५१
३६. खिसा ... ५२
३७. लक्षुमी हाय मी गुणाची... ५४
३८. वंदन देशा तूच परेशा ... ५६
३९. करीन मातृभूमीस अभिमान जैसे ... ५७
४०. देशभक्ती परि मनांमनातून ५८
४१. पणजी आज्जी पणजी आज्जी ... ५९
४२. रंगभूमी ... ६०
४३. नभराणी रंगाळली ... ६२
४४. लागे किनारी नाव ... ६३
४५. हृदय बकुळीवर ... ६४
४६. आरती दत्तगुरूंची ... ६५

४७. आजारापेक्षा उपाय गंभीर... ६६
४८. बाजार मांडलाय
देवाच्या दारी ... ६७
४९. मुंगसाच्या वाटेला
घबाड उभं ... ६८
५०. आई नि पिल्लू शुंदडशा ... ६९
५१. नीज नीज रं तान्हुल्या ... ७०
५२. माळ दवांची उरते ... ७२
५३. पहाट ओली दवात न्हाली ७३
५४. जन्म शोधतो मी ग ... ७४
५५. आस ... ७५
५६. भारतभूची जयगीते गायिली ७६
५७. हे शारदे, वाग्दान दे ... ७७
५८. इथं आसुसलेले डोळे ... ७८
५९. सडा आज गंधाळला
सांडणार ... ७९
६०. अनुत्तरित हे राहो नाते ... ८०
६१. गहाण असू दे
दिलास माझ्या ... ८१
६२. तूऽऽ,माघार घेऊ नगंस ... ८२
६३. उपास ह्यो रोजचाच ... ८३
६४. अंबेची दृष्ट ... ८४
६५. इक्कुश बक्कुश पिल्लुडं मी... ८५
६६. सुगी धुक्याची येतीया ... ८६
६७. करशील देवा मला मोगरा ८७
६८. स्वप्नं कांचनी हो साकार ८८
६९. शिव शिवानी ... ८९
७०. रूप साधे मोहविते मज ... ९०
७१. गाव नवखा जाहला ... ९१
७२. आयुष्य ... ९२
७३. ओढ जांभळी ... ९३
७४. त्या सुखाची रीत गुलाबी... ९४
७५. राम जन्मला ... ९५
७६. लळा जिव्हाळा
स्पर्श बोलती ... ९६
७७. नाते कोणते कोणत्या खुणा ९७
७८. मनीमाऊ मनभर ... ९८
७९. साथी समज ग मला खरा ९९
८०. आई १००
८१. सोन्यावाणी जगणं
जपीन मी ...१०१
८२. लाडू ...१०२
८३. मनातले घर मनीच हसते १०३
८४. सुंदर जगणे असे घडावे १०४
८५. तू सदा माझ्या
मनाला भाळवावे ...१०५
८६. रम्य माझी वाट
थोडी तू करावी ...१०६
८७. चांदव्याचे गाव माझे
तूच हो रे ...१०७
८८. जीवनाला रोज भेटी
देत जावी ...१०८
८९. साधना ही पंचप्राणा
जागवीण्या ...१०९
९०. या कमानीची खुमारी
आठवावी ...११०
९१. का राहती अधुरी ...१११



## १. दे दिलासा रे मना

तुझी एक झलक रे पाहण्या
आजही तितकीच ओढ
बंध ना जुळले तरीही
भावनांना खुळीच खोड

गाठी कुठुनी जुळती या
ठाऊक नाही रे मला
डोळ्यातले रे भाव माझ्या
नक्की कळतील बघ तुला

प्रश्न काही पडती पण ते
उत्तरावीण एकटे
जे हवे ते नाही मिळतंच
मग हवे का वाटते

चेहरा जो काळजातच
घर करुनी राहिला
लोचने मिटुनी वा उघड्या
दृष्टीने मी पाहिला

दूरवर दिसते कुठे जे
स्वप्न माझे पुसट ते
हाती आले ते का माझे
भाग्य म्हणू मी निसटते

एकदा तू वळून पाहून
वाच नेत्री भावना
पाहुनी तुज तृप्त होईन
दे दिलासा रे मना



## २. कधी थेंब हा

हा लकाके हा चकाके
थेंब सुंदर गोडुला
हिरा की मोती लोम्बणारा
पानावरती पहुडला

पानोपानी हर्ष वाहतो
थेंब बागड बागडे
पावसाच्या ज्या खुणा त्या
थेंबा थांबुनी पहा गडे

स्वच्छ झाल्या वेली झाडे
स्वच्छ पाने हिरवीगार
स्वच्छ झाल्या भुईवरी ही
लाज पसरे हिरवी शार

ऋतू पांघरतो नवी नवलाई
चातक होई तृप्त
किती दिसांची तहान भागे
थेंब थंड संतृप्त

कधी वाटते पानुकलीच्या
गालावरची खळी
कधी थेंब हा दवराणीच्या
बगीच्यातली कळी



## ३. पालवी

पालवी फुटू दे मनाला
कोंब सारे येऊ दे
एक कोकीळ गीत मधुरसे
हृदय वसंती गाऊ दे

पालवीला वर कोमलता
मनी कोमलता राहू दे
एक फुलते झाड वेड्या
आत बहरते पाहू दे

पालवीने रंग हिरवा
चैतन्याचा सांडू दे
आतल्या सृष्टीत सारा
खेळ सुंदर मांडू दे

पालवीसाठी मुळांनी
रुजविले मातीत जे
त्या खुणा अन त्याग जाणीव
पाहण्या पातीत ते

पालवीपासून नवयुग
चक्र चाले ते पुन्हा
वृक्ष सांभाळून ठेवी
बहराच्या खाणाखुणा

पालवीच्या गूज गाली
ते कळीने ऐकले
फूल होताना तयाला
मूर्त ऋतुने देखिले

पालवीवर थेंब शोभे
दव दवाचा देखणा
स्वर्गीच्या हे चित्रकारा
चित्र सुंदर रेख ना

पालवी हे पालवी ग
उमलुनी का लाजते
तव मनीही प्रियवराची
बासुरी का वाजते

जन्म सुंदर पालवी
कोवळीशीपालवी
मल्मली तारुण्य नेसे
युवती वाटे पालवी



## ४. हृदयमंजिरी

सौंदर्याची अत्तरकुपी तू
धुंद करिशी मज जिवा
जितका येतो जवळी तितक्या
मोहरती जाणिवा

बुडतो किती ते मला न ठाऊक
खोल नेत्र सागरी
मदहोशीच्या भरून वाहती
ओसंडून घागरी

रूप म्हणू की रतीस्वरूपा
यौवन देवी कुणी
रेखीयले तुज अतीव कोरीव
निर्माता तो गुणी

ओष्ठ दळे की लावण्याची
केलेली स्वाक्षरी
वर नासिका इतकी सुंदर
नजर खिळते त्यावरी

गर्द दाटसर काळ्या कमानी
भ्रूकुटीच्या वाकल्या
नयनांवरती देत पहारे
पापण्याही झाकल्या

भुऱ्या बाहुल्या कज्जल धारा
लोचन रंगही प्यारा
किती मोहिनी निर्मळ पसरे
प्रभाव पडतो गहिरा

असे वाटते हृदयमंजिरी
कुणा भाग्यवंताची
पुण्य फळावे रत्न मिळावे
तेंव्हा तू हो त्याची




## ५. मिठीत विरघळल्या तू पावसा

असे पाहशी उंच नभाला
जसा चातक मेघाला
कौतुक भरले डोळ्यामध्ये
ओढ प्रिया भेटीला

बघून आले भरून काळे
आभाळ हे पावसाळी
तुझ्या मनाचा मोर नाचतो
पिंगा राजसा घाली

आसमंत मदमस्त जाहला
बदलून गेले वारे
मनोभाव ते पुरवील राजस
कवेत घेऊनी सारे

वर्षाराणी धुंद नाचली
बागडली धरणीवर
मनात आधी ती हुंदडती
मग पडली धरणीवर

भिजून जातील गात्र पिपासित
जळा खळाळून जा
मिठीत विरघळल्या तू पावसा
जरा रेंगाळून पहा



## ६. चांदण्याचा भास हा

हे विखुरले केस माझे,
सांगती प्रणयास ज्या
सावरून घे आपुल्या या,
प्रीतीच्या खाणाखुणा

वळलेली जी नजर माझी,
सांगते तुज काही ना
समजुनी घे मौन भाषा,
मौन भावना राही ना

भेटशील केंव्हा पुन्हा ना,
माहितसे रे मज सख्या
भरभरुनी पाहू दे मज,
ओंजळीतील या सुखा

सोडले जे क्षण मी मागे,
वेचुनी घेशी पुन्हा
सावलीतुन चालताना,
का स्मरावे त्या उन्हा

ओढ वेडी ओढते मज,
तूही स्तब्ध नि थबकला
काळ थोडावेळ येथे,
भाळुनी बघ थांबला

ह्या क्षणांच्या पारिजाता,
ओघळू ना दे प्रिया
मी तुझी जी दृष्ट काढिली,
अनुप्रिया तव राजसा

चंदनाचे अंग माझे,
सोनचाफी श्वास हा
मुग्ध माझा स्पर्श कोमल,
चांदण्याचा भास हा



## ७. मी गुलाबाचे ग राणी फूल व्हावे

का बहाणा गे गुलाबाचा फुकाचा
रंग त्याचा कोणता गे सांग देखा

केवढी ही तीक्ष्ण दृष्टी कातिलानी
मी असा गेलो बुडूनी त्यात राणी

तू बहाणा ना करावा पाहण्याचा
छंद माझा प्रीत ओढी वाहण्याचा

त्या तुझ्या केसात माळू दे मला तू
रूप माझे ते फुलाचे पाह ना तू

शुभ्र वेडा तो गुलाबी होत जाई
जाणली ज्याने मनाची तार गाई

तू तुझ्या त्या स्पष्ट होकारास द्यावे
मी गुलाबाचे ग राणी फूल व्हावे



## ८. किती वाट म्या पहावी

दिसा पल्याड ह्यो दिस
रात कुसावर कुस
उंबऱ्यात थांबलेल्या
म्हातारीच्या मना पुस

व्हता वाडा भरलेला
गोकुळानं घेरलेला
आता आठवा संगती
एकटाच उरलेला

व्हता मायेचा ह्यो धनी
कुस वली लेकरांनी
धनधान्य भरलेल्या
कोठीघरात दाण्यांनी

मुखी घास जात व्हता
नाम इठू  इठू गाता
अंगणात येणं जाणं
पाव्हण्यांचा त्यो राबता

चूल सदा पेटलेली
वसा अन्न घेतलेली
सांब सदाशिव धनी
अन्नपूर्णा म्या झाली

आज तुळस एकटी
एकटीच चूल झाली
सुन्या माणसाविना ह्या
रया वाड्याची बी गेली

रोज सपान फुलतं
दारी झुंबर डुलतं
हाक वळखीची वाटं
डोळं वाटंला वळतं

किती वाट म्या पहावी
जगण्याची हद्द व्हावी
आता दिस शेवटाचा
सांज गजबज ऱ्हावी

पाखरांनो या रं या की
थोडं माघारी फिरा की
प्राण थांबल्येत हितं
कुडी देहाची निवावी

ज्योत फडफडतीया
देवघरी रडतीया
सांजवातीला एकटी
दिव्यासंग कुढतीया

न्हाय भायेर कुणी बी
आत जीव गुदमरं
एक उंबरा असा की
मन जरासं सावरं

येळ नका सांडू देऊ
खेळ नवा मांडू घेऊ
गाव वस पडलेलं
त्याला गावपण देऊ



## ९. वसा कुंभाराचा घ्यावा

अंग मातीनं माखलं
जिणं मातीनं सांधलं
देता मातीला आकार
जग मातीचंच झालं

एक एक घडा येई
जवा आकार त्यो घेई
हात मायेचा फिरता
बाप कुंभार ह्यो होई

मऊ  हात माऊलीचा
बाप धपाटा घालतो
संसाराचा गाडा बाबा
पळत्या चाकानं चालतो

घडवणं हाती जरी
न्हाय नशीब हातात
घट घडतो कोणता
मडकं फुटं स्मशानात

शुभ सुख झेलं कुणी
कुणी आसवात बुडं
देवापायी कुणी पुजं
कुणा नशिबी झोपडं

कुणी पाणपोई व्हतं
तहानला भागवीत
कुणी चुलीवर चढं
भूक भुकेची शमवीत

घडणं मिटणं चालतं
जगणं मरणं ना ठावं
कर्म करावं इसरावं
दान कुंभाराचं घ्यावं

देह घट जाण बाबा
वरी कुंभार राहतो
जीव वतून त्यो एक
एका जिवा पाठवतो

पाच तत्त्व मिसळले
पाच प्राण ते वतले
घट फुटता शेवटी
सारे मातीत मिळते

वसा कुंभाराचा घ्यावा
घट घट घडवावा
आवा आनंद लुटावा
जीव जिवा जडवावा



## १०. तुला सौख्य देते सदा मी अजुनही

कधी वाटते की मी धारा बनावी
तुझा एक आपुला सहारा बनावी

कधी वाटते की मी पाऊस व्हावे
तुला प्रीतीमध्ये मी न्हाऊ घालावे

कधी वाटते की कवळेसे ऊन मी
सकाळी तुला घ्यावे रे पांघरून मी

कधी वाटते की दवांची मी माळ
तुझ्या नादी रुणझुणती पायात चाळ

कधी वाटते चांदणी शर्वरी मी
तुला रे समर्पित जरी लाजरी मी

कधी वाटते की मी राणी ऋतूंची
तुला सौख्य देते सदा मी अजुनही



## ११. तुझा गंध माझ्या गे श्वासी उरावा

तूऽऽ मीऽऽ असे जवळी जवळी  बसू
चांदणे मंद्र थोडे...निशागाली हसू

तुझा हात माझ्या, असा हाती यावा
मनाच्या खुशीला न थारा असावा

ते दोन प्रेमिक नि सांऽऽज निवांत
मनातून तृप्ती, ऐसा लाभे एकांत

ते बघ चमकले तिथे दोन तारे
भवताल वाहतील मदनाचे वारे

तू टेकवावे तुझ्या भावनांना
निश्चिंत होऊन अलवार त्यांना

अशा गाठीभेटी हृदय कोंदणी ग
शशीच्या मनी रोहिणी चांदणी ग

ते स्पर्श मी रेशमाचे जपावे
तुला राणी हे प्रेम माझे पटावे

नको ग कधीही पुन्हा हा दुरावा
तुझा गंध माझ्या गे श्वासी उरावा
तुझा गंध माझ्या गे श्वासी उरावा



## १२. गाठू म्हायेर पंढरी

पांडुरंग भेटीचा ह्यो
किती वियोग साहिला
आज विठुराजा म्या बी
डोळा भरून पहिला

माय माझी रखुमाई वाट
बघून थकली
पोरं येतील कवा ती
काळजीनं की सुकली

चंद्रभागा उतावीळ
खळखळून दमली
न्हाऊमाखू घालण्याला
सपनात हो गमली

बुक्का अबीर बोलला
हात कुठं गेलं सारं
आम्हा उचलून टिळा
लावतील कधी का रं

माळ तुळशीची पार
झुर झुरून झिजली
पंढरीची वाट येडी
भक्ताविण की थिजली

ऐकू येई ना गजर,
माऊलीचा तो जागर
दर्शनाच्या तहानंनं
याकुळ वारकरी सागर

आता सरलं मळभ
आली आषाढीची वारी
पावलांना ध्यास उरी,
गाठू म्हायेर पंढरी



## १३. अभंगवाणी

वारी चालावी पंढरी
एक आत नि बाहेरी
ध्येय सावळा श्रीहरी
सदोदित ।।१।।

आत्मरुप बरबटे
कामक्रोधादि लिपटे।
बाप जवळी वसता
जाणीव नसे ।।२।।

देह बाहेर अडके
जिणे भंगले पडके
जीव रूपाचे मडके
रिकामेच ।।३।।

पाच पाचाचाच खेळ
घालू पाचांनीच मेळ
येता अंत वेळ
मिळो निजधाम ।।४।।

विठू बाहेर अबोल
पाषाणाचा होई घोळ
रूप कसे दाखवावे
चैतन्याचे ।।५।।

आत वसलेला विठू
त्याचा ठाव की हो गाठू
दारं नऊ बंद होता
मूर्त दिसे ।।६।।

आत विठू हो बोलका
किती भावना घोळका
सांगितले तत्त्व ऐका
मोक्षासाठी ।।७।।

वारी सफळ आतली
वारी सुफळ बाहेरी
चुकलेली आता फेरी
समाधाने ।।८।।

म्हणे मंजू दासी
उडु गेली ती उदासी
आत उजळ प्रकाशी
पांडुरंग ।।९।।



## १४. मूक भांडले अश्रू

अर्ध्या अधुऱ्या चित्रामधले
ओघळणारे अश्रू
डबडबलेल्या नयनांमधले
किती बोलके अश्रू

किती दिल्या तू खोल वेदना
मांडून जाती अश्रू
गळा दाबला जरी तू त्यांचा
टपटपती बघ अश्रू

किती दडविले तरीही निसटून
वाहत जाती अश्रू
जातांना ते कथा व्यथेची
सांगत जाती अश्रू

वाट एकली एकटी चालून
ओलवी बिंदू अश्रू
दुःख दऱ्यातून प्रवाह जातो
होऊन सिंधू अश्रू

सोडली तू मज साथ न कळले
किती सांडले अश्रू
जळतो माझ्या उरी डोंब अन
मूक भांडले अश्रू
मजसी मूक भांडले अश्रू



## १५. सुंदर असते मन रुपडे

रंग कोणता माणुसकीचा
माणूस काळा की गोरा
भूतमात्रावर जो मायेचा
अलगद घालतो बघ वारा

कुणा म्हणावे सभ्य चांगले
पोशाखावर स्तर न बरा
असू दे फाटका वरपांगी पण
देई जिव्हाळा तोच खरा

किती ओथंबून डोळ्यांमधुनी
वाहती स्नेहाच्या धारा
ज्याच्या हृदयी सहजपणाने
जीवास लाभे बघ थारा

कशास पहावे उजळ कातडे
सुंदर असते मन रुपडे
भाव मोलाचे आणि न काही
नश्वर इथले महाल गडे

शब्दवाचून स्पर्श बोलतो
देह आईचा अनुभवतो
मनात असता वात्सल्याच्या
सरिता पुरुषही माय होतो

नतमस्तक तो ईश्वर होतो
प्रेमासाठी तरसे जो
असे देखणे पाहून दृश्य
मंदिर आपुले विसरे तो



## १६. मन चांदवा होताना

तारकांच्या पडद्यात
तुझे ठळक हसणे
चेतवून भावनांना
साळसूद ते असणे

चांदव्या रे तुला कसे
सांग उधाण कळावे
सागराने ओढीपोटी
रूप भरतीचे घ्यावे

लता वेली नि झाडांनी
तुझ्या चांदण्यात न्हावे
दूर नभातून तुही
उतावीळ रान पहावे

आज सेज सजलेली
मन चांदवा होताना
आकाशात चांदवेली
कळ्या चांदण्या देताना

मेघ ओथंबून आले
दव पानोपानी पहा
तुझ्या माझ्या नात्यासाठी
थांबलेली रात अहा

आस मीलनाची तूच
तूच विरहात जाळ
तूच पुनवेला तेज
देत रातभर चाल

दिस ढकलते मीही
निशा पांघरून घेते
आत गुज तुझे माझे
कसे शहारून येते



## १७. अर्पियले मी मज तुजसी

शृंगाराच्या उभी दालनी
रूप मला मज भाळवते
बट वेडी जी अवखळ थोडी
भाव प्रियाचे चाळवते

नक्षी माझ्या वस्त्रावरती
नक्षी कोरीव प्रीतीची
रूप देखणे की मन माझे
मेंदी वाच तू हातीची

आजमाव तू कधीही मजला
किती समर्पित आहे मी
ओठावरती नाव तुझे अन
तुझीच केवळ आहे मी

दागदागिने ही आभूषणे
खुलवून जातील सुंदरता
तुझ्या नि माझ्या प्रेमासाठी
दर्पणासही आतुरता

किती छेडीशी मला राजसा
आठवून मन बावरते
सोळा शृंगारांच्या कोंदणी
लज्जेला मी सावरते

मीच बोलते एकांती किती
समजून भवताली तुजसी
हसू उमटते, घरास पटते
अर्पियले मजला तुजसी रे......
अर्पियले मी मज तुजसी



## १८. धुन माझी जी अधुरी

कुंजवनी राधिके ग छेड बासुरी
धुन माझी जी अधुरी,
कर ना तू पुरी राधे,
कर ना तू पुरी ।।धृ।।

जीव जीव मजवरी ग, असती विसंबीले
मी माझ्या राधेसंग, क्षणा थांबवीले
नाद एक उमटतो राधेश्याम उरी..
धुन माझी जी अधुरी, कर ना तू पुरी
राधे, कर ना तू पुरी ।।१।।

सांज जरा टेकलेली, बघ क्षितिजावरी
प्रीत तुझी हृदयी माझ्या भरली पुरेपुरी
संवाद हे आकारती, शब्द मूक जरी
धुन माझी जी अधुरी, कर ना तू पुरी
राधे, कर ना तू पुरी ।।२।।

काय तत्त्व राऽऽधा ही, का बुडतो हरी
मी अनादी अन अनंत, सांगे वैखरी
कोण मीच विसरू होते, प्रिये खरोखरी
धुन माझी जी अधुरी, कर ना तू पुरी
राधे, कर ना तू पुरी ।।३।।

मी अपूर्ण, नाही पूर्ण, तुजविण राधे
राधेविण श्याम नाही, सूत्र हे साधे
तुजसम नाही समर्पण, तूच कापुरी
धुन माझी जी अधुरी, कर ना तू पुरी
राधे, कर ना तू पुरी ।।४।।




## १९. शब्द सारे शांत झाले

आजकाल हे शब्द माझे,
मूक झाले एकदम
प्रियवराने वाचणे
जे बंद केले एकदम

शब्द होते भाववाही,
भारवाही जाहले
काय सांगावे कुणाला,
किती दगे मी साहिले

मार शब्दांचा भला
पण शब्दां मारणे योग्य ना
शब्द म्हणजे ह्रदय नक्षी,
तिज मिटविणे योग्य ना

उमलुनी ये ह्रदयकळी जी,
आज आधी ती सुके
हुंदकेही कळती ना,
तर रुदन माझे रे फुके

साधना, आराधना
जणू व्यर्थ वाटे अर्थही
का मला नाही उमजले,
कंटकांचे स्वार्थही

पाठ फिरवून चालला तू,
अर्धमेली मी जाहले
अन् इथे तळमळून नुसते,
जीवपुष्प मी वाहिले

कल्पना नच साहते मज,
या दुराव्याची कधी
शब्द सारे शांत झाले,
शांत मी होण्या आधी




## २०. गूज आपुले पाऊस होणे

ओल्या चिंब तुझ्या हाका त्या
मनास माझ्या करिती चिंब
तू भिजलेली निथळ चांदणी
हृदयी प्रीतीचे फुलले बिंब

केशकुंतले थेंब झाडीती
कंकण ओले राग छेडीती
कर्णफुले ओथंबून लोलक
मोत्यांची बरसातही करिती

वस्त्रावरती नदी उतावीळ
जणू सागरासाठी वहाते
मेघांचे ते दान घेऊनी
वर्षाराणी भुईवर येते

त्या अधरांवर थेंब दवाचे
मनास माझ्या उलथून देती
किती राखिले मर्यादेने
सीमा उल्लंघून ते जाती

अशा पावसाळ्यातील सखये
तुझे मुक्त ते भिजून नाचणे
ओल्या ओल्या प्राजक्ताच्या
गंधाला श्वासातून वेचणे

तुझ्या ओलसर घट्ट मिठीतुन
कधी न मी बघ विलग हा व्हावा
तुझ्याच सोबत पाऊस वेडा
वेडा हा तव प्रियकर व्हावा

चार मास भारावून जाणे
पावसातले ओले गाणे
तू मी दोघे आणिक पाऊस
गूज आपुले पाऊस होणे



## २१. घर माझे रे तुझेच काळीज

असा मल्मली पसर गालिचा
राजा संसारातही
ऊन सावल्या येतील जातील
हात राहू दे हाती

मला न परके कधी वाटू दे
ऊब एवढी देशील ना
सोडून सारे आले सजना
सामावून मज घेशील ना

घर माझे रे तुझेच काळीज
काळजी माझी वाहशील ना
न बोलले मी तरीही डोळे
भावभरले तू पाहशील ना

स्पर्श दिलासा शब्द गोडवा
साथ सदैव निभावून घे
तुझ्याच साठी जगते आहे
मनी एवढे साठवून दे

तुझ्याच वाटेवरती डोळे
जीवन माझे अंथरले
किती प्रेम मी देईन तुजला
क्षण क्षण सारे मंतरले

कधी बोचले जरीही काटे
फुंकर प्रियवरा अलगद घाल
तू प्रेमाची कणखर सुंदर
होशील ना रे माझी ढाल



## २२. म्हणूनही मी बरसून जातो

कित्ती काहीबाही साचलंय
बघ त्या मेघाच्या मनात
शुभ्र धवलसं रूप गोजिरं
काळंभोर झालंय क्षणात

दडपून ठेवत त्यानेही
केलाय खूप दूरवरचा प्रवास
दुःख बरसलं तरी कामना
मृण्मयी येऊ दे ना सुवास

ज्या धारा बघ उरात दडल्या
बळ कधी तर शल्य कधी
कोसळणे कधी कुणा नकोसे
कधी बरसणे साफल्य

कधी वेदना होत गर्जना
टाहो फोडून रडतो मी
कधी प्रियेच्या केशकुंतली
थेंबकळ्याही पाडतो मी

कधी आषाढी वारीमध्ये
वारकऱ्या पायी पडतो
कधी वळवाचा होत सडाका
ग्रीष्माला मी सुखावतो

कधी कारण तर विनाकारण ही
बरसण्यास मी तरसून जातो
कधी मनाला माझ्या वाटले
म्हणूनही मी बरसून जातो




## २३. माय बाप विठुराया ।

संसार सागर । बुडे जीवाची घागर ।
तुझ्या नामाचा गजर । तारणहार ।।

विठ्ठल विठ्ठल । घोष अंतरात ।
अणुरेणूही भरात । माय बापा ।।

देह भोग भोगी । मन व्हावे जोगी ।
आत्मा सुसंयोगी । तुझ्याशीच ।।

भाव गलबला । कर्कश कलकला ।
नाम विठू बोला । समाधान ।।

नकोच तो फेरा । व्यर्थ भवाचा भोवरा।
चक्र भराभरा । निमवे विठाई ।।

भक्त तिचे प्राण । नामसंकीर्तन ।
ऐकुनी कीर्तन । दंग होई ।।

ओवी नि अभंग । घडो संत संग ।
काम क्रोध भंग । विठू चरणी ।।

माय रुक्मिणी । बाप विठ्ठल संगिनी ।
वात्सल्य संजीवनी । लेकरांसी ।।

बहीण चंद्रभागा । नष्ट करीतसे त्रागा ।
राऊळात विठू जागा । निरंतर ।।

इये पंढरी नगरी । वैकुंठची भूवरी ।
भक्ती मुक्ती सारी । पावावी संपदा ।।

रूप तुझे गोड । एकादशी आषाढ ।
वारी चालली अजोड । देवापायी ।।

काही नको देवा । माय बाप विठुराया।
द्यावी जागा पाया । पंढरीनाथा ।।

आस दर्शनासी । मनगाभारा सुवासी ।
होई मंजुदासी । एकरूप ।।



## २४. तुझ्या सांडण्याला नको भेदभाव

तुझ्या सांडण्याला नको भेदभाव
ते पावित्र्य हृदयी, तुझे नित्य नाव

कुणा पदरी देतोस धनधान्य कोटी
कुणाला फिरविशी मुखी घासासाठी
पूस एकदा पाप नामक गाव
तुझ्या सांडण्याला नको भेदभाव

कुणाला सुखाचे पदी गालिचे अन्?
कुणाला का देतोस जळते निखारे
कुणी शांतचित्ती, कुणा केवढी हाव
तुझ्या सांडण्याला नको भेदभाव

जे कर्म घडते नकळता असे ते
कसले हिशोबन्? कसल्या पखाली
कर माफ तू एकदा सारे डाव
तुझ्या सांडण्याला नको भेदभाव

कुणाला फुले रेशमाची मिळावी
कुणाला उगा काटे रे बोचताती
भर एकदा तू कृपे सारे घाव
तुझ्या सांडण्याला नको भेदभाव

कुणाचे मरणही किती गौरवाचे
कुणाचे जिणे ते किती व्यर्थ जाते
तू मोक्षधामी ने साऱ्यांची नाव
तुझ्या सांडण्याला नको भेदभाव

देतोस गठडी अशी संचिताची
न आठवते काही, तुला जाण त्याची
ग्रहांना दे साऱ्या सुयोगाचे वाव
तुझ्या सांडण्याला नको भेदभाव

दे एकदा सारे सोडून तूंीही
किती काळज्या वाहतो देवा तूही
जीवाला शिवाचा लळा घट्ट लाव
तुझ्या सांडण्याला नको भेदभाव
ते पावित्र्य हृदयी तुझे नित्य नाव



## २५. असा दे किनारा

असा आसवांचा मला हा सहारा
नदी जीवनाची तिला ना किनारा

उसळतात लाटा नि विरतातही त्या
खुणा पावलांच्याही पुसतातही त्या

किती नावा गेल्या सहज पैलतीरा
मला तीर माझा न गवसे अधीरा

उगा वाहणे वाहणे वाहणे मी
उगा पाहणे वाट मी पाहणे मी

कशाची दरी खोल ही अंतरात
घुमे साद कोणाची हृद्? मंदिरात

तिथे देव पाषाण होऊन राहे
झिजणे मला नित्य झिजणेची आहे

असा दे किनारा मला भेटणारा
असा दे कुणी माझा मज वाटणारा



## २६. मीही नव्याने तुला रोज भेटे

उगा ही सतावे तुझी याद मजला
उगा ऐकू येई तुझा नाद मजला

तुझे माझ्या भवती असे रेंगाळणे
तुझे ते मला रोखुनी न्याहाळणे

तुझे स्पर्श माझ्या मनी नांदतात
तुझे मनसुभे कामना (का मना) सांगतात

तुझे माझ्यापाशी उगाऽऽ घुटमळणे
मला ते तुझे चोरबघणेही कळणे

डोळ्यातले भाव माझे समजणे
तुला गीत माझे असे हे उमजणे

मीही नव्याने तुला रोज भेटे
तुझे स्वप्नं माझ्या नयनात दाटे

असे एकरूपी दोघेही होणे
असे एकमेकात विरघळू जाणे



## २७. अतूट नाते तुझे नि माझे

अतूट नाते तुझे नि माझे
या स्वर्गातील गाठी
किती जन्म मी घेऊ सख्या रे
केवळ तुझिया साठी

नाते ऐसें मोरपिसी जणू
हळुवार उलगडते
रोज नव्याने भाळशी मजवर
रोज जादू ही घडते

मुरते मुरते सुंदर जीवन
झुरते मी क्षणी झुरते
तू ना दिसशील कधी मला तर
अर्धीमुर्धी मी उरते

का शिवानी असते अर्धांगिनी
सुंदर सत्य शिवाची
जन्मोजन्मीची फळे साधना
खडतर व्रते दोघांची

तीच आस अन तीच ओढ बघ
दोघांच्याही मनातुन
असले जरी ते ईश्वर केले
प्रीत दिव्य कठिनातून

जीव जडावा तुझा नि माझा
एकजीव होतांना
उरेल कैसे द्वैत कोणते
अद्वैती होतांना



## २८. मुठीत काळाला धरलं

इरलं डोक्यावरी न चिंता
इरल्या वरच्या वरी
आज नभानं दान दिलंया
मोती धरणीवरी

बिगीबिगी उचला पाय सख्यांनो,
वाट चाललीया घरी
मनात झालं सपान हिरवं न
भिजलिया माती खरी

रुजंल रुजंल बियाणं इवलं,
अंकुर वटीत धरी
उजवंल कुस तिची उपजाऊ मायेची
पोसंल माय ती खरी

सरींच्या सरीत, डोगुर दरीत
ग्वाड लई त्याची नगरी
भरा भरा ग भरभर सुखाला
सांडून वाहू द्या घागरी

डोईवर इरलं गळ्यात डोरलं
दिसाचं तेज बी सरलं
उडून कसं हे जाईल पाखरू
मुठीत काळाला धरलं
आज म्या मुठीत काळाला धरलं



## २९. राहीन सदैव कृतज्ञ त्याला

किती सुंदर तू रमणीया
तुझी कामना कमनीया
मुखमांडल हे होई विराजित
होईन मी ग कितीदा पराजित

इतके गहिरे गूज लपविले
लपवून ठेव प्रिये तू डोळे
वरती सुंदर गर्द पापण्या
जणू सावधशा दृष्ट झाकण्या

दो भुवयांच्या वेशीवरती
स्वप्नांची मज होते गर्दी
आणि मध्ये त्या कुंकुम टिळका
मज येण्याची लागे वर्दी

कळी सुंदरशी सरळ नासिका
मोहक जगण्याची ती श्वासिका
त्यावर नथणी गोल बोलते
ऐश्वर्याचे गूढ खोलते

कोमल कवळ्या ओष्ठ पाकळ्या
मदनफुलांचे दल त्या चांगल्या
त्यावर लाली अशी विराजे
मक्तेदारी प्रियाची साजे


आभूषण मोजकेच पुरती
तरी कंकण हे गजबज करिती
मुक्त सोडले जे तू कुंतल
त्यातच माझा जीव हा गुंतल

असा टेकवला कर तू माथी
भाग्य दे ना ग माझ्या हाती
लपवून ठेवीन दडवून ठेवीन
मुखचंद्राला हृदयाकाशी

मुरके मुरके स्मित हे हसरे
पाहणारा बघ स्वतःस विसरे
अशी मोहिनी मनास घालून
खुशाल जातेस निघून चालून

नको एवढे छळूस मजला
शपथ प्रीतीची राणी तुजला
एक नजर बघ तुझी मारते
तूच पुन्हा त्यातून तारते

पाहत राहीन पाहून तुजला
विसरून जाईन या जगताला
अशी कृती रेखीव आकृती
घडविली म्हणुनी कृतज्ञ त्याला
राहीन सदैव कृतज्ञ त्याला



## ३०. मन सुंदर तर विश्वची सुंदर

तू सावळीशी सुंदर कृष्णा
वाढविशी मज ह्रदयी तृष्णा
रंग रंगाचे सालस देणे
श्रीरंगाने सावळे होणे

जरी राधिका नितळशी गोरी
सावळ्याने तिज केली चोरी
रंगांचे ते रंग वेगळे
कुणा नशिबी रंग सोहळे

वरच्या रंगा खाली नितळसे
किती रंगांचे भरले कळसे
अणुरेणूंचे रंग कोणते
मन चित्ताचे रंग जाणते

अंतरंग हे जाणून घेता
आत्मरंगी तो ईश्वर कर्ता
तुज सौंदर्यामधे दिसे मज
तो विश्वाचा बघ निर्माता

स्वच्छ भावना सुंदर हास्य
अंतरातले मोहक लास्य
भाग्य उजळते शुभसंगिनी
रंग तुझा मज घाले मोहिनी

तेज चकाके तव भाळावर
आस लकाके मुखचंद्रावर
तुझे वागणे किती मधुर ग
असा भाळलो प्रिये तुझ्यावर

रंग प्रीतीचे लोभस सुंदर
रंग मदनी हे अजब कलंदर
तुझ्या रूपाचे शुभ्र चांदणे
मन सुंदर तर विश्वची सुंदर




## ३१. परमेशाचे देणे सुंदर

ईश बोलतो ईश डोलतो
कळी फुलातून खेळ चालतो
वारा सांगून जातो काही
पातीवरती लेख लिहितो

फुलाफुलातील संदेशाचे
करण्या वाचन येती पाखरे
पायांवरती पत्र चिकटते
नवे बीजही मग अंकुरते

रंग वाहती ढंग वाहती
फूलपाखरे कौतुक पाहती
गुणवंताला जाण गुणांची
मधुमक्षिका मधी नाहती

गंध सुगंध नि परिमळ वाहून
वारा जातो गंधित होऊन
बीज लाभता या धरणीला
ऋतू फुलण्याचा येतो डवरून

स्वर्गामधले सूर रेशमी
सृष्टीमधुनी जाती रंगुनी
परमेशाचे देणे सुंदर
ज्याचे त्याला यावे कळुनी



## ३२. पदर अमूल्य ग किमतीला

सहज बांधीशी अंबाडा
तो सैल पदर तुज खांद्याला
आखीव रेखीव अंगांगे तव
नजर न लागो बांध्याला

वाऱ्यावरती खेळून दमला
बिलगून जाई पदर तुला
दिसभर कितीदा हाती तुझ्या तो
लाडिक चाळे कदर तुला

घट्ट ओढुनी कटीशी खोवुनी
लागशी लगबग कामाला
येत डोईवर राखणदार तो
सदैव अब्रू मानाला

कधी घडीचा शिस्तबद्ध तो
कधी टाकला एकेरी
कधी सुलटा तर कधी उलटा तो
प्रकार नाना पाहेरी

कलाकुसरीचा मोर नाचरा
वेलबुट्टीही सांभाळी
कधी खसखस बघ पिकते हसरी
पदर आळी मिळी गुपचिळी

घ्यावी ओटी भरून त्यातची
त्यातच संसाराची फळे
बाळ पोसणे त्या आडूनच
सौख्य मायेचे त्यात कळे

चुका झाकीशी पदराखाली
भावसरिताही वाहे उरी
काया जर्जर झाली तरीही
वात्सल्याची ऊब खरी

तुझे शील सांभाळून राही
कायम सेवा दिमतीला
सोबत करतो क्षणाक्षणाला
पदर अमूल्य ग किमतीला



## ३३. हृदयाकाशी प्रकाश

सुसाट वारा नभी पसारा
कसे कुणा सांगावे
उन्मळतील का मुळे येथली
संकटांनो पांगावे

कसे मिळूनी येता धावुनी
गडगडाट मेघांचा
वीज तळपते दिपवून डोळे
ठोका चुके हृदयाचा

सुटला वारा पिसाट झाला
आगापिछा न ठेवी
उधळून नाचत सुटला वेडा
संगे उडवून नेई

गार जाहली हवा बोचरी
अंगा येई शहारा
घरादारावर घनगंभीर त्या
आभाळाचा पहारा

प्रकाश गेला दडपून सारा
अंधाराचे राज्य
उगाच येते वरती भीती
तिचे पसरे साम्राज्य

कधी एकदा सरते मळभ हे
मोकळे हो आकाश
आत प्रकटतो स्वच्छ पांढरा
हृदयाकाशी प्रकाश




## ३४. दोन धुक्यांनी ...

पावसाळ्यातल्या धुक्यानं
काचा सगळ्या वेढल्या ना
खिडकी स्वच्छ नितळ होती
दृष्टी धूसर घेरल्या ना

तुझ्या आठवांना तर
ऊत येतो अशातच
धुक्यातही भूतकाळ
स्पष्ट होतो अशातच

काच बाहेरची पुसता पुसता
आतून एक धुकं येतं
डोळ्यावाटे आभाळ होत
लोंढा वाहत मुकं होतं

उपनेत्राची काच मला
वारंवार पुसावी लागते
काहीच घडलं नाहीय आत
मी निर्विकार दिसावी लागते

तेंव्हा बाहेरचं धुकं मग
आतल्या धुक्याला सावरतं
आतल्याचं दुःख पाहून
तेही वेडं बावरतं

आपल्याच धुंदीत होतं ना ते
एवढा वेळ ऐटीमध्ये
हरवलं म्हणे बाहेरचं धुकं
दिसेचना दिवटीमध्ये

आतल्या धुक्याचे हुंदके जरा
आता त्याला कळू आले
इतरांना पुसट करणे किती सोपे
स्वतः होताना रडू आले

पुन्हा माझ्या चष्म्यावर
त्याच्या आतून आभाळ झरलं
दोन धुक्यांनी दुःख माझं
पेलवत पेलवत हाती धरलं

दोन धुक्यांनी दुःख माझं
पेलवत पेलवत हाती धरलं




## ३५. प्रेमाची शिदोरी वेगळी गं

अबोली बकुळीने धरलाय फेर
प्राजक्ता राणीच्या बघ चौफेर
सांग सांग कोण आहे मनी सखे तो
गाली तुझ्या हसू देऊन लपलाय जो

सोडा सोडा वाट माझी जाऊ द्या मला
असं कुणी कोंडतं का नाजूकशा फुला
कुणी नाही कुणी नाही माझया गो  मना
अलवार फुलले मी सहजी पुन्हा

आज कशी वेगळीच वागलीस तू
फुलताना गालामध्ये लाजलीस तू
शुभ्र तुझ्या पाकळ्याही थरथरल्या
लाज गाली येऊनिया का बिथरल्या

नाही गं सख्यांनो, बकुळफुलांनो
अबोलीच्या राण्यांनो, समजून घ्या
वारा थोडा गारगार,
झोम्बला ग फारफार
म्हणून ही थरथर उमजून घ्या

कुणीतरी आहे तुझ्या मनात बसलं
आतून कुणीतरी लाडिक हसलं
लपवू नको, आम्ही सख्या तुझ्या
सांगणार नाही कुणा गोड गुपिता

कसं सांगू आला तो गं भुलला म्हणे
गंध माझा घेऊनिया डुलला म्हणे
सोन्या माझा सोनचाफा जपेन मला
कोशी त्याच्या अलगद ठेवेन मला

खरं सांगू मीही रंगरूपावर भाळले
मोहूनिया गंधावर मागे मागे चालले
आता बाई अर्पियले माझे मीच त्याला
सोनचाफा प्राजक्ताचा नुकताच झाला

कित्ती छान गोडी गं, अनुरूप जोडी गं
प्रीतीची भेट मोठी आगळी गं
एकमेका गंध द्या जीवनी सुगंध घ्या
प्रेमाची शिदोरी वेगळी गं
प्राजक्ता गालात लाजली गं



## ३६. खिसा

आधीच कोणते हे,
ओझे कमी मनावर
डावीकडेच शिंपी,
शिवतो खिसा तयावर

सदराही ओझे असतो,
भपक्या प्रतिष्ठितेचा
किंमत तयाची इतुकी,
तो बेगडीच चेहरा

वामांगी त्याच्या बसला,
'आ' वासुनी खिसा हा
शोभे ना रिक्त कधीही,
भरणे पसा पसा हा

आतून पैसा डोले,
घे घे जे दिसते बोले
कधी वेडा हा कुणाचा,
दिपवून टाकी डोळे

खुळखुळ करीत राही,
टिकणे न त्याला माहित
इकडून तिकडे जाणे,
तिकडूनही प्रवाहित

असता हा भरलेला मग,
केंव्हा रिकामा होई
समजे न मजला काही,
भरणेच नित्य येई

भरला म्हणून ओझे,
ओझे रिकामा असता
मजजवळी नाही ऐपत,
सांगीत तोही बसता

करण्यास स्वाक्षरी मज,
नेहमीच लेखणी दे
अडकून वरती शोभे,
ऐसी महार्हतेने

वाहनपरवाना,
ओळखंही जपावी
आधार पॅन सारे,
मैत्रीत सांभाळावी

चिल्लर कधी पडावी,
मी वाकताच थोडे
कधी चोरटे कुणी ते,
डल्लाही मारणारे

असता मी बाल जेंव्हा,
गोळ्या नि चॉकलेट
भरतो उगाच सारे,
काहीही ओझे त्यात

येताच लाडामध्ये,
लग्नाची बायको ही
पाहते हळूच घेते,
अंदाज याचा तीही


पण मी खरा सुखावे,
जेंव्हा परी ही माझी
घालून हात इवला,
सांगे ना मक्तेदारी

बाबा हा माझा आहे,
सारा खिसा पसारा
चिंता नको करू तू,
होईल ना घसारा

होऊन मीही मोठी,
भरणार सौख्य यात
आणू नकोस पाणी,
बा तू उगा डोळ्यात

तेंव्हा पुन्हा हा वाके,
प्रेमाच्या ओझे ऐसा
क्षुल्लक क्षणात होई,
मायेपुढे हा पैसा

सार्थक होई खिसा,
आज सार्थक होई खिसा



## ३७. लक्षुमी हाय मी गुणाची

कुक्कु कोऽऽरते कोऽऽरते भाळावर मोठ्ठं
माझ्या धन्याला घरधन्याला,
औक्ष लाभू दे देवा धट्ट

कस्सा राबतोया राबतोया
घरासाठी रानामंदी
मला काळजात येण्याला
न्हाई कवाच त्याची बंदी

रोज आईन्यात पाहतीया
त्याचाच  देखणा मुखडा
माझ्या चेहऱ्याच्या आडूनबी
हसतोया चांदवा तुकडा

गोंदगोंदण त्याच्याच नावाचं
हातावर ह्या
त्याला गवसु दे गवसु दे
मायेचं चांदणं माझ्या

भरलाया म्या हिरवा चुडा
हातभर काकण किणकिण
चोळी न लुगडं, डोईवर पदर,
कुक्कु बंदा रुपाया खण खण

उजेड पडलाय घरात समद्या
मनाचा परकाश ढवळा
अंगणात रांगतोया नातवंड
मेळा  शिरीरंग खेळतोया सावळा

काय मला पाहिजे संसारात
ह्या  धान्यांनं भरल्यात कणग्या
लेकीबाळी अन सुना जावयांनी
सणावारात आनंद समद्या

गाईम्हशी दुधदुभत समदं
गोकुळ नांदतया दारी
आषाढी कार्तिकी विठू
माईची वरसाला दोनदा वारी

अंगणात सड्याचं शिंपण,
रांगोळी, चुलीला शेणाचं लिंपण
उखळ, मुसळ, जात्यावर दळण
पाटा वरवंटा, कांडण कुटण

हिरीचं पाणी शेंदून आणी,
मुखात अभंग वाणी
दुःखात कशाला डुबून
ऱ्हायाचं सुखाची गायाची गाणी

धन्याचा अन माझा जोडा सोन्याचा
नजर ना लागो कुणाची
मीठ मिरची म्या उतरून टाकीन
लक्ष्मी हाय मी गुणाची,
धन्याची लक्ष्मी हाय मी गुणाची

## ३८. वंदन देशा तूच परेशा

असे उडू दे घेत भरारी
आकाशातून छेदित यान
छाताडावर शत्रूच्या या
लक्ष्य साधू दे ध्येय महान

जातकुळी सापाची त्यांची
दबून दावा धरणारे
दबकून रहावा शत्रू सदोदित
कर्म धाडसी करणारे

देशासाठी सैनिक झटतो
मातृभूमी ती वंद्य मानतो
उपकारांना या मातीच्या
तोच खरा हा असा जाणतो

रक्त सांडले तरी बेहत्तर
शत्रू संगे लढे बहाद्दर
प्रश्न असुदे हजार सत्तर
शूरपणाचे देही अत्तर

वाघ फिरावा निधड्या छाती
करे टेहळणी शत्रूसाठी
स्वकीय नाही कुणी तयांचे
देश आधी मग सारे बाकी

झोप नाही की नसे शांतता
डोक्यामध्ये विचित्र गुंता
किती असू दे जीवन लिहिले
जगणे खरे ते शत्रू चिरडिता

देश माय अन देश बाप हा
शतजन्मांचा पुण्यवारसा
मरणे कोणा नसे सांगा ना
खेद नसू द्या मनी फारसा

कितीही जन्म मी ओवळीन या
मातृभूमीच्या रक्षणकार्या
चळचळ कापत राहे रिपुदल
रक्त धमनीतून वाहते धैर्या

वंदन देशा तूच परेशा
माती लल्लाटी
चंदन गंध येई सुगंध
ही ऐशी माती

## ३९. करीन मातृभूमीस अभिमान जैसे

वाट थोडी कठीण ही मला वाटते
जेंव्हा सोडून आपुल्यांस येणे असे

देशसेवेत गुंतून जातो असा
घर कायम दूरच असते मला

सुट्टी घेतो नि जातो मला भेटण्याला
आईच्या नजरेत स्वप्नात राहण्या

बाबा ना काही जरी बोलतात
मनातून आवाज ऐकू येतात

असे भाऊ मोठा सदा पाठीशी कीं
डोळ्यात पाणी तो अडवून ठेवी

सीमेवरी निघणे जड हे किती ना
शत्रुसवे लढणे सोपे मला ना

हळूच वाहणाऱ्या या अश्रूंना मीही
लपवीत दडवीत गुपचूप राही

नहाणीघराने पाहिली  कितीदा
डोळ्यात विरहाची नदी वाहताना

असा धावतो वाहतो पाट मोठा
रडतो मी धुमसून तिथे एकटा हा

आताशी मुले माझी बिलगून रडती
नका जाऊ बाबा, तुम्ही पुन्हा म्हणती

अशी वाहते बांध फोडून सरिता
डोळ्यात लपवून रडतो कधीचा

मग सावरंत येतो हळुवार मीही
खाऊ, नि पाप्या, भेटवस्तूही काही

रमती ही बाळे क्षणी खेळण्यात
जड पावले, पत्नीही मज उदास

तरी सोडणे, सोडणे त्यांस लागे
सुख ठेवतो क्षणक्षणांचे मी मागे

तिथे एक माझी असे माऊली ही
जिच्या रक्षणाची शपथ वाहिलेली

ती राहो सुरक्षित असे ध्येय माझे
किती जन्म देईन तरी न्यून आहे

अशा आसवांना मी गिळतो लगेच
आलो गे माये मी आलो लगेच

तुझ्या हासण्याने मी हसता गे राहीन
संकट सारे मी पेलून नेईन

घराला वचन देतो मी आज ऐसे
करीन मातृभूमीस अभिमान जैसे

## ४०. देशभक्ती परि मनांमनातून

तू डोळ्यात तेल घालून
दोन ज्योती रोखून धर
शत्रू डोळे दिपवून टाकीत
दिपवाळीला सार्थक कर

तू सैनिक अभिमान न केवळ
मजला आहे देशाला
भीक न घालीशी रिपुदल तुडविशी
चळचळ कापू दे वैऱ्याला

विजयादशमी रोज होऊ दे
रोज तू विजयी व्हावा रे
तीच दिवाळी माझ्यासाठी
तोच अनोखा मेवा रे

भाग्य लागते भाळावरती
देशसेवेची रेखा ही
भविष्य नक्की उजळून येईल
प्रणाम तुजला अनेका ही

श्वासावरती नाव देशाचे
कोरून ठेवीले कायमचे
तुझ्यासारखा पुत्र पती वा
मित्र लाभणे पुण्य आमुचे

या देहाची काय तमा रे
पार्थिव सारे भंग पावते
देशभक्ती परि मनांमनातून
अनंतकाळ ती अभंग राहते

देश देश तुज देश दिसू दे
हास्यातून तव देश हसू दे
नको कोणते आक्रमण परी
निवांत त्याला सुखे वसू दे

## ४१. पणजी आज्जी पणजी आज्जी

पणजी आज्जी पणजी आज्जी
कित्ती गोड तू
हापसुल्या आंब्याची
सोनेरी फोड तू

काम तुझे शिस्तीचे
धडे देवभक्तीचे
कामाचा फडशा
पाडशील तू
पणजी आज्जी पणजी आज्जी
कित्ती गोड तू

स्वयंपाक करतेस
रुचकर छान
हातावरचं करतेस
पूर्णची काम
घराचा पक्का ग जोड तू
पणजी आज्जी पणजी आज्जी
कित्ती गोड तू

आज तुझा वाढदिवस
आठावर पाच
माझ्यासवे तूऽऽ
चल ग नाच
शंभरीचा नारळ नक्की तू तोड
पणजी आज्जी पणजी आज्जी
कित्ती गोड तू
हापसुल्या आंब्याची
सोनेरी फोड तू

## ४२. रंगभूमी

रंगभूमी रंगात न्हाऊनी
नवरस सारे तनी भिनऊनी
किती भावना किती भाव हे
कृतार्थ आजही त्या प्रकटवुनी

एक विचार होई सोहळे
तासांमध्ये जन्म आकळे
सारे सारे प्राण ओतुनी
जन्मा येते रूप वेगळे

नाट्य जगावे, नाट्य हसावे
नाट्य रडावे, क्षण पकडावे
नाटक पुढती, तयारी मागे
रंगभूमीवर जुळती धागे

हे नाट्य असे की जगणे माझे
रंगभूमी की जीवन सारे
क्षणात रसिका घेऊन जाते
नाट्य मनातील बोलून जाते

वसन भरजरी आयुष्याचे
विणले जाते बहु कष्टाने
क्षणाक्षणाची भावमनाची
तलम वीण साधून नाट्याने

नाट्य कुणाचे रचणाऱ्याचे
की ते अभिनित करणाऱ्याचे
दिग्दर्शक, संगीतकाराचे
अथवा असंख्य राबत्या करांचे

तो नट असतो की आपण
प्रतिबिंबाचे मनदर्पण
कायिक वाचिक अभिनयाला
हळव्या मनाचे समर्पण

नाटक या साऱ्या साऱ्यांचे
ज्यासाठी त्या रसिकवरांचे
त्याहून अधिक ते जिथे नांदले
प्रत्येक मनीच्या रंगभूमीचे

अंक अंक गुंफूनचि येता
अजोड काही अमूल्य काही
जगण्यासाठी रत्न देतसे
नित्यनिरंतर ही रंगभूमी

रंगभूमी ही बहरत असते
कालपटली ती विहरत असते
ध्येयामधुनी या साऱ्यांच्या
नित्यनवी साकारत असते

ती अजरा, ती अमरा
कालजयी प्रेक्षक नजरा
कळा सोसुनी जन्मा घालीत
नाट्य होतसे उजळ चेहरा

रंगभूमी की प्रयोगशाळा
नवजन्माचा रोज सोहळा
रंगभूमी ही ऐशी माता
नाट्यकोंब उरी जन्मे कोवळा

रंगभूमी, तू सारे काही
क्षणाक्षणाचे नाते होई
तू मी, मी तू, परागकण
मनात फुलते अत्तरबन

जगणे मरणे रंगभूमी
सवय चांगली रंगभूमी
रक्त धमणीचे रंगभूमी
आत्मतत्त्व हे रंगभूमी

श्वास गुंफणे रंगभूमी
आस गुंतणे रंगभूमी
संचिताचा न्यास देखणा
रंगभूमीपुढे स्वर्ग ठेंगणा

मी जन्माला येईन जेंव्हा
रंगभूमी वा नाट्य होण्याला
भावधुमारे लेऊन सारे
साक्षी होईन या सोन्याला



## ४३. नभराणी रंगाळली

नभराणी रंगाळली,
जरा जरा पेंगुळली
झुळझुळणाऱ्या झऱ्या काठी
अशी रेंगाळली

तिचे रंग सांडलेले,
तिचे स्वप्नं रंगलेले
तिच्या भावनांचे धागे,
रेशमाने सांधलेले

तिची उसंत निवांत,
तिचे मन शांत शांत
तिचा राजस कवेत,
आज तोही हो प्रशांत

तिचे हास्य हो सालस,
रूपरंग निखालस
खळी खुलते केशरी,
चंद्र चांदण्या विलास

सांज मंद मंदावते,
निशा धुंद धुंदावते
अंग अंग चेतवीत,
रती मदना पावते

झरा कावरा बावरा,
मिठी तिची घट्ट झाली
नभराणी उतरून,
त्याच्यासाठी खाली आली

एक प्रणय गोडवा,
दृष्ट लागू नये त्याला
रंग का बरे खुलले,
कळू आले हो झऱ्याला



## ४४. लागे किनारी नाव

जाणे ज्याचे त्याला पुढती
हात दिलासा देईल
कधी कुणाचा सहज आधारही
बळ हत्तीचे देईल

हत्तीसाठी सुद्धा असते
प्रेरणा किती गरजेची
अवाढव्य ते शरीर आपुले
वाहून ते नेण्याची

माहूत त्याचा मित्र
देईल जर का हात
दिलाश्याने त्या गजराजही मग
चढवील तनु यानात

करणे असते ज्याचे त्याने
आपुले आपुले काम
तरीही स्नेहाचा एक कटाक्ष
लाखमोलाचे नाम

पापपुण्याचे संचित भोगणे
जीवन त्याचे नाव
निखळ साथ जर मिळते कुणाची
लागे किनारी नाव



## ४५. हृदय बकुळीवर

असा गुंफला हार बकुळीचा
की मन माझे तू
नाजूक माझ्या भावफुलांना
प्रीत दे धाग्यातून

एक एक अलगद उचलून घे
फुलास हाती रे
प्रेमासाठी प्रवेश देण्या
उत्सुक नाती रे

शर्थ एक बघ जपणे त्यातून
नाजूकता सांभाळ
मनास इतुके हळवे कर की
मग माझा प्रतिपाळ

कोसळले जरी तरुवरातून
खाली मी भुईवर
वेचून घे ना तरल भावना
हृदय बकुळीवर

आज ओवला गजरा साजूक
हात तुझे गंधित
प्रीत पोचते सुमनातली ही
सुमनी अखंडित



## ४६. आरती दत्तगुरूंची

जय देव जय देव जय गुरुदत्ता
आशीष द्यावे तुमच्या भक्ता,
जय देव जय देव ।।धृ।।

त्रिगुणात्मक रूपाचे लोभस ध्यान
चोवीस गुरू करुनिया साधियले ज्ञान
गुरुविण नाही या जगती सन्मान
दाखविले आचरणी देऊन प्रमाण
जय देव जय देव ।।१।।

नानाविध रुपात आविष्कृत झाले
दत्तावधूत गुरुराज केले
जीव शिवाचे एकात्म ठेले
प्रसन्न होऊन आशीष दिधले
जय देव जय देव ।।

दत्त दत्त नाम हृदयी कोरु
दत्त दत्त ध्यान अंतरी धरू
दत्त दत्त एक तत्वचि स्मरू
दत्त कृपेने भवसागर तरु
जय देव जय देव ।।

जय देव जय देव जय गुरुदत्ता
आशीष द्यावे तुमच्या भक्ता,
जय देव जय देव।।

## **४७. आजारापेक्षा उपाय गंभीर**

आजारापेक्षा उपाय गंभीर
सांगा ना कसं हो रहायचं खंबीर
कोड्यात कोडं पडलंय आज
सापाला गिळून बसलाय उंदीर

देवाचा पत्ता बदललाय अन
गर्दीनं भरून गेलंया मंदिर
अनीती उजळ माथ्यानं हिंडतीया
मलिदा खाऊन बिळात उंदीर
सांगा ना कसं हो रहायचं खंबीर

माणसाची नाडी लागंना खरी
वैद्याचा मेंदू थकलाय जरी
डॉक्टरचा भरवसा यंत्रावर
संगणक गुंडाळून फरार उंदीर
सांगा ना रहायचं कसं हो खंबीर

आलेत बाप्पा फिरायला इकडं
टांगलीया संस्कृती सगळंच त्रांगडं
भक्तांची थेरं आकसले बाप्पा
सोन्याचा होऊन थिजलाय उंदीर
सांगा ना रहायचं कसं हो खंबीर
आजारापेक्षा उपाय गंभीर

## ४८. बाजार मांडलाय
## देवाच्या दारी

बाजार मांडलाय देवाच्या दारी
फुलंही त्याची पानंही त्याची
त्याचेच हारं न त्याचीच दोरी
माणसाची चाललीय उगा शिरजोरी
बाजार मांडलाय देवाच्या दारी

राबणारे हात शेतात दिनरात
घामाचं मोती शेतकरी पिकवती
पैक्याची वाणवा कष्टाची मस्करी
दलाल खुश त्याची फुकाची चाकरी
बाजार मांडलाय देवाच्या दारी

गाईम्हशी सांभाळी गुराखी आळी
खव्यात मैदा भेसळ भेसळी
भुकेनं पोटशूळ गरिबा घरी
मिठाई देवाच्या प्रसादा भारी
बाजार मांडलाय देवाच्या दारी

नवसाचं पीक बघा लईच सुपीक
भाजतीया पोळी भीतीची कणिक
पावणाऱ्या देवाची प्रसिद्धी भारी
वाढतीया गरागरा ढेरी खाणारी
बाजार मांडलाय देवाच्या दारी

भक्ती न भाव, नुसताच आव
गाभाऱ्यात कसला बडेजाव
कोण खरा देव, देवालाच भ्येव
देवात माणसात केवढी ही दरी
बाजार मांडलाय देवाच्या दारी

श्वासात श्वास, देवाचा ध्यास
देवाला माणसातल्या देवाची आस
मोजून दिलेत, कळू न दिलेत
तरीही कळंना देवंच भारी
बाजार मांडलाय देवाच्या दारी




## ४९. मुंगसाच्या वाटेला घबाड उभं

मुंगसा मुंगसा दाखव तोंड
सकाळी सकाळी बातमी गोड
काहीतरी काहीतरी घडणार शुभ
मुंगसाच्या वाटेला घबाड उभं

सकाळी यायचा वासुदेव दादा
मुखात त्याच्या गोड गोड कथा
परंपरा आता गेल्या कुठं
मुंगसाच्या वाटेला घबाड उभं

काव काव कावळा छतावर करी
कुणीतरी येणार पाहुणे घरी
सोन्याचा घास त्याच्या चोचीत तिथं
मुंगसाच्या वाटेला घबाड उभं

सुपातलं दान मणभर मान
दारी आला पाहुणा पक्वान्न पान
आनंद साठायचा कणगीत हितं
मुंगसाच्या वाटेला घबाड उभं

सांजवत दिवा तुळशीला ठेवा
नंदादीपाचा देवाला हेवा
धुपाची दरवळ विरली कुठं
मुंगसाच्या वाटेला घबाड उभं

वाट पाही उंबरा उपडा पेला
देवाला पाण्यात बुडवून ठेवा
अक्षत निरोप पोचवी जिथं
मुंगसाच्या वाटेला घबाड उभं

ये रे पुन्हा तू अंगणात ये ना
विस्कटली घडी तू बसवून जा ना
गावाला पुन्हा तू कर रे उभं
मुंगसाच्या वाटेला घबाड उभं
काहीतरी काहीतरी घडणार शुभ



## ५०. आई नि पिल्लू शुंदडशा

मी गजराणी तू पिल्लू गुणी
आज रानात उत्सवगाणी

माझी चाल अशी गजगामिनी
अनुसरण्याला उत्सुक रमणी

शृंगार केला फुलपानांचा
वनी गंध गेला फुलराण्यांचा

आले शोधत पक्षी मला नि तुला
ये कुशीत पिल्लुडी शिरण्याला

मी घेईन पापी सोंडीने
तुजला जपणे मज निगुतीने

चल चालून जायचे जगणे असे
तुज व्हायचे मोठे नकळतसे

आई नि पिल्लू शुंदडशा
चित्रात काढण्या याव्या अशा



## ५१. नीज नीज रं तान्हुल्या

निजलेल्या शोनुल्याला
खबर ती कशी काय
शेतामंदी राबणारी
त्याची कणखर माय

रोज राबावं गाळावं
थेंब घामाचं रानात
तवा चूल पेटतीया
पडं भाकर पानात

स्वाभिमानानं खावं रं
नगं लाचारी जगणं
हात देणारा राहू दे
नगं काही बी मागणं

कशी सजवू मी शेज
माझ्या लाडक्या रं तुला
व्हतो मातीचा मंचक
झाड फांदीवर झुला

पांघरून घे राजुल्या
लुगड्याचीच वाकळ
घर गरिबाचं हाय
आपलं जगणं धाकलं

तुला घातलं टोपडं
पणजी आज्जीचं लुगडं
दुपटं लंगोट त्याचंच
तिचं औक्ष तुला थोडं

नीज नीज रं तान्हुल्या
निसर्गाच्या कुशीमंदी
माय धरणी बी हाय
तिच्या लेकरांच्या संगी

न्हाय रडायचं बाबा
माय करणार काम
बाप आणतोया रोज
जमंल तितकं रं दाम

खाती तोंडं हायती मोप
तुला भावंडं अनेक
झोपडीत मेळा व्हतो
गोळा गोतावळा देख

एक सांगते लेकरा
न्हाई दमायाचं कधी
येती लक्ष्मी रहाया
राबणाऱ्या हातामंदी

निगुतीनं समजुतीनं
बाळा तुला वागायाचं
काळ्या मातीला आणिक
मायबापा जागायचं



## ५२. माळ दवांची उरते

झाला निशेचा लोळागोळा
थंडी गारठली
डोळा लागतो तिचा प्रभाती
गोधडी पांघरली

अंगावरती काटा फुलला
निशा ही कुडकुडली
कुशीत शिरुनी निशाकराच्या
लाजून गडबडली

चंद्र म्हणाला येई प्रिये तू
चांदणे मज उबदार
वर पसरले धुके बावळे
शहारे आणते फार

शीत ऋतूतील नीज गुलाबी
स्वप्नं ही उरातली
सखे सोबती प्रियवर असता
प्रीतही भरातली

ती चिडली बघ उगा रोहिणी
निशेस घेतो जवळी
म्हणून अबोला धरला तियेने
केली सूर्याला कागाळी

म्हणे दिनकरा उगवून लवकर
द्यावा मज पतीराज
शुद्ध न त्याला  निशा लाभता
चमकून जाय नभात

गाली हसला अंशुमाली अन
उषा ही प्रकटली
घट्ट मिठी ती निशाशशीची
दिनपतीमुळे सुटली

कशास येतो ऋतू हा शीतल
वेडा गारवा पसरे
रात्रींना बिलगून जाणारा
प्रियतम मजसी विसरे

इकडे निशेच्या अंगावरती
माळ दवांची उरते
प्रियतम शृंगाराच्या खुणा त्या
पुन्हा पुन्हा मनी स्मरते




## ५३. पहाट ओली दवात न्हाली

पहाट ओली दवात न्हाली
थंडी गुलाबी आली
शृंगाराच्या मधुर महाली
वर्दी हुडहुडी गेली

झोप जाहली साखर गोडी
ऊब हवीहवीशी
कुणी उतरली अप्सरा जणू
झगा धुक्याचा ल्याली

सगळे दिसते पुसट पुसटसे
प्रीत स्पष्ट बघ झाली
मिठीत येते नाविन्याची
सुरभित गंध नवाळी

सूर्य उगवतो हळूहळू जणू
उषा त्यास बिलगली
निसर्गातुनी थंडीची किती
मस्त मजा चालली

चंद्र कुशीतुन निजला अजुनी
रजनी झोपाळलेली
स्वप्नं प्रियेला सांगताच मग
लाज गाली उमटली

पहाट ओली अंग चोरटी
ऋतुराणी शहारली
ऋतू थांबला न्याहळत तिजला
ती आपसुक जवळी आली



## ५४. जन्म शोधतो मी ग

किती फिक्या बघ पडती साऱ्या
वृद्धत्वाच्या रेषा
किती हासरी विलसून जाते
ओठी हास्याची रेखा

प्रेमाला ना बंध वयाचे
वय जरी वाढले कितीही
पवित्र प्रेमा नसते काळाची
अथवा कशाची भीती ही

जन्मभरीची साथ लाभते
साथ मिळेल जर आता
शब्देविण संवाद होऊनी
सूर भावना होता

नजर बोलते आताशी आपुली
समाधानाची भाषा
चित्रकारही शोधत असतो
अशी सुखाची रेखा

जरीही सदैव वरती दृष्टीने
पाहत गेलो तरी मी
तू मला शिकविले नजर झुकवणे
हारच  नसते नेहमी

तुझ्या ह्या झुकल्या नयनांमध्ये
जन्म शोधतो मी ग
मीच गवसलो मला हा आणिक
कायम तुझाच मी ग

असे सोबती जगलो सुंदर
जीवन लोभसवाणे
मरण येऊ दे असेच सोबत
संगत दोघे जाणे



## ५५. आस

मला, जीवनाला तुझी आस आहे
क्षणाला मनाला तुझा भास आहे

कुणी सांगते वेड का लागले हे
दिवाण्यास वेडे तुझा ध्यास आहे

कधीही मला आजमावून घे ना
कधीही तुझ्या सोबती दास आहे

दिलाच्या तु खोलून दारास पाहा
तुझा मूर्त मी तेथ विश्वास आहे

तुला सांगतो ऐक राणी जरासं
तुझा आसमंतात आभास आहे

करू का तुझ्या नावचा गाव माझा
तुझ्या नावचा श्वास निःश्वास आहे



## ५६. भारतभूची जयगीते गायिली

देशप्रेम मज मनात आहे
पोटासाठी हा धंदा
प्रजासत्तेचा दिवस आजचा
राष्ट्रध्वजाला हो वंदा

मनात भक्ती देशाची मज
देशासाठी काय करू
भारतमातेचे ऋण जन्मी
कोणत्याच मी कसे चुकवू

जिने जन्म दिधला मज आई
जिने जगविले ती मातृभूमी
तिच्या रक्षणासाठी माझ्या
अंगामध्ये वाहो धमणी

रक्त वाढवती भाज्या सगळ्या
मी माणसांना शक्ती देण्या
रोज करतो जी घडते सेवा
बलवर्धक नागरिक हो होण्या

आज तिरंग्याला मी सलामी
दिली या माझ्या भाज्यांमधुनी
गाजर आले केसर रंगी
मुळा शुभ्र पांढरा मधूनी

खाली हिरव्या भाज्या सजल्या
देशप्रेमाने टवटव झाल्या
तिरंगा माझा बघण्या साऱ्या
बालबालिका मोदे जमल्या

आनंदाची लहर उमटली
राष्ट्रभक्ती मज मनी प्रकटली
भारतभूसम भूमी ना कुठली
तिची माती मी मस्तकी लावली
भारतभूची जयगीते गायिली
जयगीते गायिली



### ५७. हे शारदे, वाग्दान दे

हे शारदे, वाग्दान दे
जिव्हेवरी मज स्थान घे ।।धृ।।

होई विराजित तू सदा
मुख शोभते सुवाणी मधा
विद्याधरी कलासुंदरी
नाींद संगीत उमटू दे
जिव्हेवरी मज स्थान घे
हे शारदे, वाग्दान दे ।।

स्फुरतील मजला कवन हे
साहित्यसंपद ज्ञान जे
किती अर्थ देशील शारदे
मंजुभाषिनी साद दे
जिव्हेवरी मज स्थान घे
हे शारदे, वाग्दान दे ।।

मुखरित कृपेने सृष्टी ही
शब्दार्थ भावन दृष्टी ही
अधिवास असू दे नित्य तुझा
मज दान माते आज दे
जिव्हेवरी मज स्थान घे
हे शारदे, वाग्दान दे ।।



## ५८. इथं आसुसलेले डोळे

माया निथळते सिंधू
बिंदू अनाथांचे सांधू
ओढ आंतरिक होती
घर मनात ग बांधू


प्रेमस्पर्श भाषा तिची
नजरेत गे वात्सल्य
माय साऱ्या लेकरांची
ज्यांचे हरवले बाल्य

काही जन्मती विभूती
जगताच्याच कल्याणा
निज जीवन बोजड
मन समाजाचे होण्या

दुःख पेलणे ना सोपे
फरपट किती हाल
तरी मायेचा आधार
झाले सनाथ ते बाल

देव अवतरती ना
नित्य रुपात आईच्या
आज देवही सनाथ
ऊब कुशीत माईच्या

ये ग ये ग सिंधू माई
तुला पुन्हा जन्म घेणे
इथं आसुसलेले डोळे
त्यांना स्वप्नं एक देणे



## ५९. सडा आज गंधाळला सांडणार

तुला आज सांगू कसे मी प्रिये ग
तुला नित्य मी जीव हा लावणार

मनाला असे मोरपीशी फुलारे
तुला आज मी गीत हे सांगणार

अशी वाट माझ्या मनाची घराशी
तुझ्या थांबते पाऊले चालणार

नको बंदिवासी तु राहू उगाच
तुझे भाव या काळजा चोरणार

लपूनी छपूनी असे का जगावे
खुलेआम मी प्रीतीला मांडणार

तुझे बाहुकोशी मला स्वर्ग लाभे
तुला भाव वाहून मी चाहणार

तुझ्या अंगणी पारिजाती फुलांचा
सडा आज गंधाळला सांडणार



## ६०. अनुत्तरित हे राहो नाते

तुझ्या नि माझ्या प्रीतकथेचे
कसे सांगू गोडवे
उलटून जातील युगानुयुगे
माधुरी अधिक वाढवे

तू मी मी तू जवळी असू का
नसू सोबती वेडे
तरीही राधाकृष्ण नाम हे
एक मधुरसे कोडे

नसती सगळ्या प्रश्नांची बघ
उत्तरे शोधून मिळती
अनुत्तरित हे राहो नाते
शब्देविण भाव कळती

तुझ्याच नयनांमध्ये बुडूनी
कृष्ण गहिरा होतो
तुझ्या प्रीतीच्या कोमल स्पर्शे
मोहन हिरा ग होतो

कशास भुललो कसे सांगू मी
राधा नेमकी कोण
एकात्म एकरूप एकचित्त मग
उरतील कसे ग दोन

मला शोधण्या निघतील जन तर
राधे राधे मनी म्हण
श्याम राधेविण नसे वेगळा
राधाश्याम कण कण



## ६१. गहाण असू दे दिलास माझ्या

प्रिये किती बोलके हे डोळे
कसे सावरू मना
वरती लावण्याच्या कळा मग
काळीज धडधडते ना

असा थबकलो थिजलोही मी
काही सुचेना मला
असे वाटते निरखत रहावे
मोहिनी राणी ग तुला

चेहरा तुझा की सौंदर्य
मूर्त रूप जाहले
असे देखणे रूप साजिरे
कधीच ना पाहिले

भाळून जाणे विसरून सारे
फक्त तुला प्राशने
नजरेमधुनी सामावून तुज
हृदयातही तुला पाहणे

बांधा नाजूक चेहरा साजूक
किती गोडवा भरला
बिंदीमधुनी तुझ्या चांदवा
हळुवार डोकावला

गहाण असू दे दिलास माझ्या
तुझ्या हृदय कोंदणी
सांभाळून ग ठेव प्रिये तू
लाखमोलाची खणी

## ६२. तूऽऽ, माघार घेऊ नगंस

चाल रं गड्या पुढं पुढं
संकटांचा धाक नगं
तुझ्या मनामंदी आऽऽस भरघोस
तूऽऽ, माघार घेऊ नगंस

मार्ग असू दे कसा बी,
चालणं तुला चालणं
ध्येयासाठी कठीण वाट
पायाखाली घालणं
हिरवळ असू दे की,
रान सारं ओस
तूऽऽ, माघार घेऊ नगंस

साथी सोबतीस कुणी,
असंल नसंल
कुणी वाटंमंदी थकून,
भागून बसंल
नगं तुला कसल्याच,
शिदोरीचा सोस
तूऽऽ, माघार घेऊ नगंस

पोचायचं पैलतीरी, सोड तू रं ऐल
नगं उगा गुंतू बाबा, नाती सारी फोल
गळू ना दे अवसान, बांध नवा जोश
तूऽऽ, माघार घेऊ नगंस

चाल रं गड्या पुढं पुढं
संकटांचा धाक नगं
तुझ्या मनामंदी आऽऽस भरघोस
तूऽऽ, माघार घेऊ नगंस



## ६३. उपास ह्यो रोजचाच

श्रद्धा माझी भक्ती हाय
देवा चरणाशी तुझ्या
नगं काय बी रं मला
पाठी ऱ्हावं सदा माझ्या

न्हाई देवघर घरी
न्हाई घर ऱ्हायला बी
हाय तुटकं झोपडं
त्यात कोनाड्यात तू बी

दाराम्होरं फुफाट्यात
माती कालवली म्या बी
शिवलिंग बनविलं
पोराबाळांच्या संगती

शिवरात आली व्हती
शिवारात राबताना
झालं अंगण राऊळ
माती पावन शिवा ना

दारी हुबं बेल झाड
येडं वाट पाहतंया
आज त्याचं पांग फिटं
बेलपान वाहतंया

देवा हात जोडतीया
ग्वाड मानून त्वा घ्यावं
मनामंदी शिव शिव
लेकरांना औक्ष द्यावं

न्हाई पंचामृत तुला
न्हाई अभिषेक देवा
मनामंदी भाव सच्चा
हात माथ्यावर ठेवा

शिवलिंग तुझं हाती
देवा रेखीयलं म्या की
उपास ह्यो रोजचाच
सारं गोकुळ पायाशी



## ६४. अंबेची दृष्ट

तुज नजर ना लागावी अंबे
दृष्ट काढिते ग अंबे दृष्ट काढिते
तुझ्या सात्विक रूपाची
कृपा ही लाभते
अंबे, कृपा ही लाभते ।।धृ।।

तुझी नजर मायेची
विश्वाला पोसते
तू भक्तासाठी कष्ट माये ग
अमाप सोसते
त्या नजरेला, ना नजर लागो
दृष्ट काढिते ग अंबे दृष्ट काढिते
तुझ्या सात्विक रूपाची
कृपा ही लाभते ।।१।।

तुझी लेकरं आम्ही ग
भरवीते तू घास
मज ध्यानी तू, मनी तू
अंतरी तुझा मज ध्यास
त्या वात्सल्याला, नजर ना लागो
दृष्ट काढिते, ग अंबे दृष्ट काढिते
तुझ्या सात्विक रूपाची
मज कृपा ही लाभते ।।२।।

तुझ्या तेजाने उजळून
दाही दिशा ह्या जाती
त्रिदेवही शक्ती रूपाने
तुझी साधना करिती
त्या शक्तीला, नजर ना लागो
दृष्ट काढिते ग अंबे दृष्ट काढिते
तुझ्या सात्विक रूपाची
मज कृपा ही लाभते ।।३।।



## ६५. इक्कुश बक्कुश पिल्लुडं मी

इक्कुश बक्कुश पिल्लुडं मी
गोंडुलं शोनुलं टिल्लूडं मी

कुणी म्हणे काळं काळं कुत्तुचं पिल्लू
शेंबुड लोळं त्याचा डोळे गोल गोलू

खेळतील पोरं सोरं संगती माझ्या
गल्लीत गोंधळ उनाडक्या साऱ्या

सकाळी सकाळी गवतात छान
पहुडलो निवांत वळवून मान

भूक जरा लागलीय देशील का दुध्धु
तोंडातून निघेना साधं माझ्या भू ऽऽऽ भू

गटागट पिऊन चाटून जिभल्या
खेळायला येईन मी पकडा पकड्या

कान माझे भारी शेपटी तरारी
दुडूदुडू धावतो मी बारकू जरी

चला चला खेळू या रे दोस्तांनो खेळू
आनंदाने थोडंसं गवतात लोळू



## ६६. सुगी धुक्याची येतीया

वाट धुक्यानं भरलीया
रात कवाची सरलीया
हितं गारव्याची शिरशिरी
अशी अंगात शिरलीया

झाडं दडून बसल्येत
पानं लाजून हसल्येत
कुणाकुणाला पहायचं
समदी अंधुकसे दिसल्येत

कुणी येईल का रावा ग
मला जवळ घ्याया ग
कुणी बघणार न्हाई
धुकं पांघरून घ्यावं ग

आली आली चाहूल आली
म्या हरवून बाय गेली
कसं सांगावं गुज सगळं
म्या मलाच बिलगून गेली

सुगी धुक्याची येतीया
जाळं पिरतीचं इनतीया
सखा मदन भेटतोया
रती मनात खुलतीया



## ६७. करशील देवा मला मोगरा

फुले मोगरी हसरी हसरी
घेऊन हातामध्ये
सुगंध पेरीत जाईन सखये
तुझिया जगण्यामध्ये

असे वाटते होत मोगरा
मीच उमलावे राणी
अलगद वाऱ्यासवे तुझ्याशी
जवळून गूजकहाणी

कळी होऊनी झाडावरती
कौतुक तुझे मी घ्यावे
जवळी येशील वाट पाहशील
भाग्य डोळा मी पहावे

जपशील मजला जीवापाड तू
वेळेवर जल देऊन
वाढत जाता उष्मा सगळा
साथ देईन मी उमलून

घेशील हाती घेत जवळी तू
गंध हुंगुनी सजनी
जन्म सार्थकी लागेल माझा
गंध तुला तो देऊनी

करशील देवा मला मोगरा
तिच्या अंगणी नक्की
मीलन असू दे क्षणिक तरीही
गंधवेडी मज सखी



## ६८. स्वप्नं कांचनी हो साकार

लोलक सुंदर नाव बहावा
सुवर्णरंगी फुले वाह वा
निसर्ग रमतो स्वच्छंदाने
पिवळा सोहळा असा पहावा

कुणी प्रियेच्या प्रतीक्षेत तर
कुणी अनुनय करण्या जातो
उमलून आल्या बहाव्याकडे
गुज मनीचे घेऊन जातो

उमलून उमलून हसणारा तो
प्रियारंजनी सहाय्य करतो
तप्त झळा अन ग्रीष्मामधल्या
तापावरती उतारा ठरतो

तिच्या कुंतली माळून देता
रूप तिचे ते उजळून जाते
एक अनामिक गीत प्रीतीचे
बहाव्यासवे डोलून जाते

तिचे बहाणे तूही जाणतो
तुझा केवढा मज आधार
तुझे फुलोरे अतिकोवळे
स्वप्नं कांचनी हो साकार



## ६९. शिव शिवानी

तुझा हात हाती शिवाच्या शिवानी
ऐश्वर्य सारे तुझ्या पावलांनी

संन्यस्त मी जगतासाठीच झुरतो
तरी पार्वती तूजसवे पूर्ण उरतो

अर्धांगिणी तू सदाशिव शिवाची
भवानी तू असता, ना चिंता भवाची

तू प्रकृती तलम कोमल मनाची
मी आदिपुरुष सृष्टी आपुल्या कणाची

रुद्राक्षहाती तुझा कर मी घ्यावा
फुलासम तू नाजूक पूर्ण संकल्प व्हावा

तू प्रत्यक्ष शक्ती, तू मूर्त भक्ती
तुजविण हा शिव शिव ना,
तुजवरी अनुरक्ती

जगन्माता तू, मी पिता सर्वसाक्षी
महादेव देवी ही संज्ञा युगाक्षी



## ७०. रूप साधे मोहविते मज

सावळ्या रुपात गोडी
तू अबोली थोडी थोडी
दोन डोळे बोलणारे
वेगळाली रोज कोडी

मन्मनी तू रुंजी घालीशी
ओष्ठी थरथर का उगा
मजसी सांगते मन हे माझे
तू न देशील मज दगा

मोकळे ते केस वेडे
शोधती तुज राजसा
सांगुनी वाऱ्यास जणू ते
म्हणती आणचि आजसा

ती प्रतीक्षा जळते नयनी
ती उदासी सांड तू
एक हसू उमटू दे सखये
स्वप्न नवे ग मांड तू

का उगा ताणून धरिल्या
भ्रूकमानी वाकल्या
भावना कळल्या मला तव
तू किती जरी झाकल्या

रूप साधे मोहविते मज
मी तुझ्यावर भाळलो
दूर कोठे जाऊ प्रियतमे
कोशी तव गंधाळलो



## ७१. गाव नवखा जाहला

विसरलो गावास आणिक
माणसे इथली हरवली
शेण गाई अन म्हशींचे
कौतुकाची हो परवली

पाहिली ना माती इथली
गावपण ना पाहिले
पाहण्याचे प्रेम इथले
भाव हळवे राहिले

साधे जगणे राहणी ही
सरळ साधी माणसे
जग पुढारून गेले म्हणती
गवसली का माणसे ?

दूर केले सृष्टीला
निसर्गही दूर सारला
हक्क सुंदर जगण्याचा
प्रगत मानवे मारला

पायवाटा पुसून गेल्या
महामार्ग गुळगुळ बांधले
हृदय काढून खुंटीवरती
सोयीने मग टांगले

चुकून आली पिढी ही पुढची
गाव नवखा जाहला
नववे आश्चर्य जणू मग
शेणपावटा पाहिला

कौतुकाने चित्र त्याचे
भ्रमणध्वनीतुन घेतले
गावठी मातीने चक्क
हात मस्तकी टेकले



## ७२. आयुष्य

सरते सरते सरते आयुष्य
सहजी सरते सरते सरते आयुष्य
झुरते झुरते झुरते आयुष्य
खूपदा झुरते झुरते झुरते आयुष्य

करते करते करते आयुष्य
सोबत करते करते करते आयुष्य
झरते झरते झरते आयुष्य
काळ चाळणीतून झरते आयुष्य

मरते मरते मरते आयुष्य
कुणी न आपुले उरता मरते आयुष्य
ठरते सुंदर ठरते आयुष्य
मनासारखे कुणी भेटता सुंदर आयुष्य

पुरते पुरते पुरते आयुष्य
क्षणाक्षणाला जगताना
मग पुरते आयुष्य
भरते भरते भरते आयुष्य
कर्मओंजळी भरते आयुष्य

कुरकुर करता कुरकुरते आयुष्य
आनंदाची पखरण करता
स्फुरते आयुष्य
जगून घ्यावे भरभरून भरभरून आयुष्य
देहाविणही सत्कर्माने उरते आयुष्य



## ७३. ओढ जांभळी

झाडे जांभळी पाने जांभळी
फुले जांभळी, रात जांभळी

भुईवर पसरून, दुलई जांभळी
चंद्र प्रकाशी, चांदणी जांभळी

लळा जांभळा, मळा जांभळा
पौर्णिमेतला चंद्र जांभळा

तेज जांभळे, स्वप्नं जांभळे
स्पर्श जांभळे, जळही जांभळे

जांभूळ गोष्टी ऽऽऽ, वेळाही जांभळ्या
जांभुळबनी ऽऽऽ, प्रीतकथा जांभळ्या

रंग कोणते, सांग प्रीतीचे
हास्य रतीचे, बघ ना जांभळे

मदन जांभळा, बाण जांभळे
जाळे जांभळे, कोडेही जांभळे

अंगावरती, रंग जांभळा
मनात माझ्या, संग जांभळा

रीत जांभळी, प्रीत जांभळी
जांभळ्यातली, ओढ जांभळी




## ७४. त्या सुखाची रीत गुलाबी

रंग गुलाबी ढंग गुलाबी
संग गुलाबी अंग गुलाबी
ऋतू गुलाबी सृष्टी गुलाबी
वचन गुलाबी स्पर्श गुलाबी

असे पाहुनी उमलून येते
स्वप्न मनातील होत गुलाबी
सदैव देशील संख्या मला तू
साथ तुझी रे अशी गुलाबी

जुळून येतील नाती आपुली
त्या नात्यांचा गंध गुलाबी
रेशीम जोडून देईल धागे
त्या धाग्यांचा पोत गुलाबी

हसणे माझे झुळूक सुखाची
त्या सुखाची रीत गुलाबी
मनात सहजी फुलून येता
अवचित होईल प्रीत गुलाबी

जीवन सहजी सुंदर होईल
रंग मनातून सजीव गुलाबी
तू मज नाही दुजा वेगळा
जीव जीवापाड होय गुलाबी

रंग एकदा चढला की मग
उतरत नाही कधी गुलाबी
खोल खोल गहिऱ्या डोहातील
हलचल चंचल होय गुलाबी

## ७५. राम जन्मला

देखीयले रूप तुझे,
जन्म तोषला
राम जन्मला अयोध्यी
राम जन्मला ।।धृ ।।

चैत्र मास नवमीदिनी सूर्य अवतरे
अवताराचे जे कार्य दैवे योजिले
तेजोगोलकची जणू हा चमचमचमला
विष्णू बालरूप पहा राम सावळा
राम जन्मला अयोध्यी
राम जन्मला ।।१।।

वीर रघुवंश तेज वारसा दिला
कौसल्या दशरथास बाळ लाभला
तरसले जे नयन रूप पाहण्या मुला
पुत्र पाहुनिया येई पुण्य फळाला
राम जन्मला अयोध्यी
राम जन्मला ।।२।।

मातृपितृवचन बंधुप्रिय सखा खरे
राजकुमार हा धीरोदात्त वावरे
प्रजावत्सलता त्याच्या मनी पाझरे
दिव्यरूप अभिराम राम जाहला
राम जन्मला अयोध्यी
राम जन्मला ।।३।।

दुष्ट दुर्जनासी कली काळ तो ठरे
गुरुवंदन कर्तव्ये प्राणप्रिय बरे
एकपत्नी एकबाणी वचन एक रे
राज्य कसे असावे हा पाठ घातला
राम जन्मला अयोध्यी
राम जन्मला ।।४।।

उद्धरण्या कैक जीव सहे यातना
स्थितप्रज्ञ देव जणू दुःख भोगण्या
आदर्शाचा हा वस्तुपाठ पाहण्या
हनुमंत स्वामी सीताकांत शोभला
राम जन्मला अयोध्यी
राम जन्मला ।।५।।



## ७६. लळा जिव्हाळा स्पर्श बोलती

लळा जिव्हाळा स्पर्श बोलती
जिवा जीवांची नाती जुळती
शब्द नसले तरी डोळे वाचून
मूकपणे बघ भावही कळती
लळा जिव्हाळा स्पर्श बोलती

माणूसपण हे माणुसकीचे
कातडीवरल्या ना रंगाचे
वरपांगी ना टिकते काही
खोल मनातुन भाव डोलती
लळा जिव्हाळा स्पर्श बोलती

आईपण मग मिळो कुणाला
हृदय आईचे प्रत्येकाला
वात्सलता त्या तिथे पाझरे
पाषाणही जळ स्रवू लागती
लळा जिव्हाळा स्पर्श बोलती

कपिशावक ते बिलगून गेले
वृद्ध मनाला कोंबची फुटले
माया कळली दोन जीवांना
आपसुक डोळा अश्रू गळती
लळा जिव्हाळा स्पर्श बोलती



## ७७. नाते कोणते कोणत्या खुणा

उगाच स्मरते घर ते आपुले
अंगणातली उभी नारळी
मातीमधले स्पर्श मुलायम
फांदीवरली अबोलशी कळी

आकाशाशी नाते जडवीत
उंच उंच नारळी वाढली
जमिनीतले निर्मळ जळ ते
पोटामध्ये दडवून गेली

पावसातले तळे साठले
त्यात बुडविले बाल्य आठवले
तारुण्यातील सहवासाचे
क्षण सुगंधी अन भिजलेले

गाव सोडता आईच्या मज
मनातली ती गलबल बोले
अश्रू तेंव्हा तिचे मायेने
ह्याच अंगणी बघ ओसरले

सुखदुःखाच्या खुणा उराशी
सांभाळून हे अंगण गप्प
कधी वाटते घर किलबिलले
आज माणसाविन का ठप्प

आई माझी अंगणातल्या
ओसरीवरी दिसते मजला
तुळशी वृंदावनी तेवती
सांजवात खुणविते का मला

मन धावते पुन्हा पुन्हा अन
देह तळमळे गावी जाण्या
खोल रुजलेले ते अनुबंध
नाते कोणते कोणत्या खुणा



### ७८. मनीमाऊ मनभर

मनीमाऊ  मनीमाऊ
ये ग बिलगून जाऊ
थंडीतले क्षण
उबदार ऊन खाऊ

ये ना अशी जवळी
माया बघ बावळी
तुझी माझी गट्टी
कोणाला कळली

रंग तुझा राखाडी
आहेस तू तडतडी
क्षणी माझ्या हाती तर
क्षणी मारतेस उडी

तुला देते दूध खाऊ
भराभर खाऊन घेऊ
जिभल्या चाटत
ढेकरही मग देऊ

म्याव  म्याव घरभर
मनीमाऊ मनभर
दोघींची जोडी
कौतुक गावभर



## ७९. साथी समज ग मला खरा

गढून गेली कशात राणी
की तू रुसली सांग जरा
नकोच चिंता करुस कसल्या
साथी समज ग मला खरा
साथी समज ग मला खरा

शृंगाराच्या पूर्णत्वाने
उजळून जावा तुझा चेहरा
एक अनामिक पसरे उदासी
डोळ्यांमध्ये खंत जरा
साथी समज ग मला खरा

ते कुंकुम तव भाळावरती
गोल ठळक जरी रेखीयले
अबोल का ग तेही झाले
भाव कोणता बर गहिरा
साथी समज ग मला खरा

सळसळणारी बटही थांबे
गालावरती स्तब्ध जरा
वाराही ना हिम्मत करतो
उडवून नेण्या तिजसी खरा
साथी समज ग मला खरा

ओठांवरची लाली बोलली
दुःख कोणते आत तुला
सजूनही का अपुरा दिसतो
ग्रहण ग्रासला तुज चेहरा
साथी समज ग मला खरा

बोल सखे जे हृदयी दडले
उलगडले ना जेही मला
पसरून देईन अल्लड खुशी ग
मानू नको मज तू उपरा
साथी समज ग मला खरा
साथी समज ग मला खरा



## ८०. आई

हृदयाशी तू धरले मजला
अन हृदयातून भरले ग
जन्म लाभता आई शब्द हे
आपसुक ओठी स्फुरले ग ।।धृ।।

स्पंदनांसवे तुझ्या मी जगतो
गर्भामध्ये असताना
रुधिर देऊनी तू पोशियले
शून्य असा मी असताना
वजा तुझ्यातून होताना मी
काही माझे बघ नुरले ग
जन्म लाभता आई शब्द हे
आपसुक ओठी स्फुरले ग ।।

रूप ईश्वरी असते जननी
सोशियले तू कष्ट किती
देत राहते तरी तुझी ना
ओंजळ ठरते कधी रिती
वात्सल्याचे भाव मनातून
सदैव माझ्या मुरले ग
जन्म लाभता आई शब्द हे
आपसुक ओठी स्फुरले ग ।।

चिंतन माझे क्षणाक्षणाला
अंतःकरणी करिशी तू
अखंड माया झरा होऊनी
अविरत जीवनी वाहशी तू
पापकर्माचे जाळे माझे
तुझ्यामुळे बघ विरले ग
जन्म लाभता आई शब्द हे
आपसुक ओठी स्फुरले ग ।।



## ८१. सोन्यावाणी जगणं जपीन मी

चल चल राणी, सोन्याचं पाणी
सुर्व्याचा दिमाख  दावीन मी
सकाळी सकाळी रामाच्या पारी
सुखाचं चित्तर रेखीन मी

झाडाची काडी न काडीवर माडी
तुझी माझी जोडी हाय देखणी
घरट्यात पिल्लं गजबज झाली
चोचीत चोच कुजबुज गाणी

जीव इवलुसा दांडगी आशा
पंखात बळ बघ आभाळाचं
दोघं दोघं जाऊ ग, संगतीनं ऱ्हाऊ ग
भ्या न्हाई कशाचं काळाचं

पाण्यात सोनं का सोन्याचं पाणी
सोनेरी जगात सोन्याची राणी
पिरतीची सखी, गुणाची कशी
सोन्याचा संसार किलबिलवाणी

अंगावर ऊन्हं, निवांत क्षण
मनातलं बोल ग ऐकीन की
तुझ्याविना काय मी, तू तर हाय मी
सोन्यावाणी जगणं जपीन मी

## ८२. लाडू

लाडू आनंदाचे पाडू
त्याने सुखाचे चित्र काढू
कधी मनातून फुटती लाडू
कधी पंगती वाढू

कण कण मोतीचूर असो वा
अन्य कोणताही तो
दोन हातांनी सांधून बांधू
प्रेम स्नेह पाघळतो

गूळ साखरेचे ना दिसते
रूप कुठे नजरेला
तसाच जगण्यासाठी गोडवा
हृदयातून विरघळला

कणाकणातील गोडी उतरून
मधुर होतसे लाडू
कण कण त्याचे खरे अस्तित्त्व
तरी मिरवतो लाडू

प्रतीक होतो सणसंस्कृतीचे
लाडू दिसतो गोडू
चला जीवनी सुंदर क्षण हे
लाडूसारखे जोडू

असो हजारो कण वेगळे
मजा न खाण्याची ती
वळला जातो लाडू जेंव्हा
गंमत खाण्याची ती

एक एक मग घास चाखू या
एकत्रित होऊनी
एकत्रित ते सारे क्षणही
हसतील लाडू होऊनी



## ८३. मनातले घर मनीच हसते

आखीव-रेखीव सुरेख घरकुल
निसर्ग संगती पक्षी किलबिल
पाहताच वाटे घर माझे
होईल का कधी बांधून स्नेहल

असेच स्वप्नामधे हे दिसते
मी रमलेली सदैव असते
कुणी मनातील साथी सोबत
मीही घरी या विसावून बसते

वर मोकळे नक्षत्रांचे
अंगण नभीचे उतरून यावे
आणि धरेवर हरित दुलई
हिरवळीने मग पसरून जावे

श्वास मोकळे घेण्यासाठी
किती दालने खुली असावी
नजर मोकळी धावविण्याला
खिडक्यांची नक्षीही दिसावी

मन रमावे घरात सुंदर
आसमंतीही सुंदर परिसर
घर मनीचे मन स्वप्नीचे
स्वप्नं रातीचे रात निरंतर

पहाट होता घर ना दिसते
मनातले घर मनीच हसते
साथी मनाजोगता मनातच
सहजीवन मग मनात वसते



## ८४. सुंदर जगणे असे घडावे

जिद्द कशाला ऐशीतैशी
जीव घेतला तरी उराशी
जगण्याची आशा न संपावी
गर्भातुनी कोंबांच्या राशी

कठीण किती जरी गुदरे प्रसंग
रडणे नाही मना न खंग
अतुल्य जिद्दीपुढे वाकवून
निसर्गासही करणे दंग

किती तलवारी आणि कुऱ्हाडी
जरी कोसळल्या पडल्या धाडी
अंगामधल्या धमन्या सळसळो
उगवून येवो पुन्हा धडाडी

चिवट जिद्द ना सोडती झाडे
कधी भुई तर कधी पहाडे
थेंबही जिथे जळ ना मिळते
तरी कुठूनसा अंकुर वाढे

जगायचे तर असे जगावे
मरणालाही कोडे पडावे
मी का आलो उगाच येथे
सुंदर जगणे असे घडावे



## ८५. तू सदा माझ्या मनाला भाळवावे

चांदण्यांच्या तेजबिंबा पाहिले का
तू तुझ्या त्या तेजकांती चांदव्याला
सांगताना तू मला का मोहवीशी
मी तुझ्या प्रीतीस राणी बांधण्याला

तू सदा माझ्या मनाला भाळवावे
चित्रकाराने कधी त्वा आळवावे
हास्य मोहाचेच जाळे सांग ना गे
मी असे का त्यात स्वतः गुंतवावे

ते तुझे दो बोलके जे नेत्र राणी
रोज माझ्या जीवनाचे छंदगाणी
हारतो मी रोज वेडे ते नशीले
पाहतो मी रोज त्यांना धुंद डोळे

दंतपंक्ती मोतियांची मांदियाळी
भाग्य बिंदीही लकाके जी कपाळी
ओष्ठ दोन्ही पाकळ्या की लोणगोळे
माधुरीच्या गोडव्याचे गोड चाळे

नासिकेची सोनचाफी मोहवेली
चांदणीही चांदव्याची खोवलेली
कर्णभूषा हीरपन्ने टांगलेले
तीळ काळा हा हनूची दृष्ट काढे

तू अशी जी लाजलाजू लाजलेली
गाज माझ्या सागराच्या आतली ही
ये कधी तू जीवनी हो संगिनी गे
अप्सरा ना कोणती, तू भावलेली



## ८६. रम्य माझी वाट थोडी तू करावी

गारव्याचा गुच्छ कोणी पेरलेला
रंग त्याचा लाल सारा कोरलेला
पाकळ्या की गंधवेड्या त्या पखाली
चित्र डोळ्याला हवाही गार घाली

ग्रीष्मदाहाची मुजोरी वाढलेली
या धरेने कोंबबीजे गाढलेली
त्रस्त तीही केवढी चिंता तियेला
का शहारा गूलमोहोरास आला

अंगअंगी रंग त्याच्या सांडलेला
खेळ त्याने सुंदराचा मांडलेला
ऊन तो झेलूनही सांगा निराळा
थंड त्याने मुग्ध केलेल्या ग ज्वाळा

मार्ग थोडा मोहुनी जो थांबलेला
सावलीचा मेघ काळा रांगलेला
त्या तिथे तो ताप आगी ओकणारा
हा इथे तो ताप अंगी शोषणारा

हो कधी माझ्या मनीचा गारवा तू
मोहराच्या पाकळ्यांचा मारवा तू
मी कसे सांगू किती रे ताप सारे
तू झुळूकीचा सखा हो चांगला रे

रम्य माझी वाट थोडी तू करावी
सावलीची साथ माझ्या तू धरावी
मी कशाला घाबरावे काळज्यांना
मोहराची थंड काया पांघरावी



## ८७. चांदव्याचे गाव माझे तूच हो रे

अंगणाला कुंपणाचा बांध का रे
आणि माझ्या या घराला उंबरा रे
राहु दे ना खूण काही प्रीतवेडी
त्या तुझ्या तू काळजाला सांग ना रे

येऊ दे ज्या भारलेल्या भावना त्या
भावनांना चांदण्यांचे नाव द्यावे
का उगा त्या आडवूनी ठेवीशी रे
एक त्यांना आपुलेसे गाव द्यावे

वेळ जाता कोण कोणा सावरावे
एकटे हे बावरे हृद आवरावे
कोण येई पाहण्याला सांग वेड्या
का तुझ्या माझ्या क्षणांना नाव द्यावे

प्रीतकोशी धुंद राशी पांघराव्या
मी तुझ्या बाहूत आशा माळवाव्या
येऊ दे त्या संकटांना सज्जतेने
गोड धागे गुंतवूनी तोंड द्याया

सांग तू आता तरी जे भाव प्यारे
प्राण माझे ऐकण्याला थांबलेले
जीव माझा जो भुलावा ती कबूली
दे प्रिया काळास मी ही टांगलेले

ऐकु दे ना एकदा ते शब्द सारे
प्रीतलेखाचे धुमारे वाहणारे
सोपवूनी तारकांचे ते नजारे
चांदव्याचे गाव माझे तूच हो रे
चांदव्याचे गाव माझे तूच हो रे




## ८८. जीवनाला रोज भेटी देत जावी

रंगरूपे सुंदराचे साजिरे हे
पीत पाचू वर्ण सारे अंथरावे
ह्या भुईने स्वर्ग खाली आणवावे
कामनांचे कुंचले हे जाणवावे

एक सोन्याची ग धारा पाझरावी
एक धारा रूप ल्याली ओसरावी
सूर्य तेजाच्या पखाली वाहतो ना
साज ल्येल्या गोड राणी पाहतो ना

हात येथे टेकवून तो वाकलेला
प्रीतखाणीतून गर्भा झाकलेला
वाढला की वाढवेडा कोंब प्यारा
एक सोना एक हारीतास झेला

टाकुनीया चोरचोरी पावलांना
यौवनाच्या ज्या खुणा ह्या पावलेल्या
पाह ना तू लाजलेले मंद वारे
साक्ष सारे स्वर्गभूमी मीलनाला

मी विसावा रोज घ्यावा या सकाळी
अंगअंगी घेत जावी ही झळाळी
जिंदगीची आस मोठी  वाढणारी
जीवनाला रोज भेटी देत जावी



## ८९. साधना ही पंचप्राणा जागवीण्या

का उगा ही खंत वाहे जीवनाची
थेंबथेंबा मेळवीण्या कष्ट वेची
आस ठेवी वाहणारी आत थोडी
चाखण्याला लाभते ही गोडगोडी

माणसाचे कर्म ऐसें घातकी हे
नीरसाठे संपवीले स्वार्थ पाहे
भूजलाच्या पातळीच्या खोल खोली
खोद खोदूनी तयाला शोषलेली

प्राज्ञ आम्ही ज्ञान आम्हा केवढे हे
स्त्रोत पाहे बुद्धिचे हे आटलेले
आटलेल्या ह्या झऱ्याला जीव लाभो
सांधुनीया घेऊ धागे फाटलेले

बिंदुबिंदूची नवाळी होय गोळा
थेम्बथेंबी पाहुनीया कृष्ण काळा
ऊतणे ना मातणे व्हावे जरासे
साधना ही पंचप्राणा जागवीण्या

पंचभुते देह होई बांधलेला
शर्थ व्हावी आणि देहा वाचवीण्या
तत्त्व कोणी कोणते हे जाणियेले
शेवटीही घोट लागे प्राण जाण्या

ही महीमा रे जळाची ओळखावी
जीवनाची जी उपाधी तू पहावी
वाचवावे थेंब पाण्याचे क्षणाला
ही धराही प्रीतवर्षावी नहावी



## ९०. या कमानीची खुमारी आठवावी

या कमानीला तुम्हाला भेट देणे
एक वेडे सौख्य पायी लांघवीणे
तोरणे बांधून झाडे वाकलेली
सावलीच्या सोहळ्याला साक्ष देणे

ते उन्हाळे संपती ना तप्त ज्वाळा
वाहनांच्या शर्थ होती धावण्याला
एक थोडा भाग ऐसा झाकलेला
कंच पाचू रंग त्याते माखलेला

चाळण्या की गाळण्या त्या आतपाच्या
थंड वाऱ्या धुंद साऱ्या हुंगण्याच्या
पाखडावे ऊन सारे या सुपाने
आणि धान्ये चांदण्याचे घेत जाणे

वाटते की मार्ग हा ना संपणारा
हा ठरावा जीवनाला सांगणारा
भोगिले जे दुःख ते ते सोड मागे
या कमानीला न काही तोड राजा

वाटते येथेच यात्रा गोठवावी
देखण्या रस्त्यात चित्ते पाठवावी
चालणे ते चालणे ना थांबताना
या कमानीची खुमारी आठवावी



## ९१. का राहती अधुरी

का राहती अधुरी,
काही मनात स्वप्ने
नाती अधुरी काही,
काही अपूर्ण चित्रे

स्वप्नांस काय सांगू,
थांबा मिटू नका ना
सत्यात यावे तुम्ही,
ऐका मनास माझ्या

नात्यात जीव गुंते,
ओतून प्राण झाले
तरीही कुणी जवळचे,
का दूर दूर गेले

जमवून रंग सारे,
ते कुंचले फिरावे
तरीही उदास पाही,
पटी चित्र ते उरावे

नाही कमीही काही,
आले जरी जुळुनी
जुळल्या का सांजतारा,
ना ये मला कळुनी

यत्ने थकून गेली,
ती पूर्णता मिळविण्या
तरीही अपूर्ण जन्म,
केली मी शर्थ जुळण्या

आभास भास सारे,
प्रत्यक्ष फोल वारे
झाले फितुर का रे,
माझेच भाव मजला
झाले फितुर का रे,
माझेच भाव मजला

# लेखिकेचा परिचय


- **डॉ. मंजूषा पंढरीनाथ कुलकर्णी,**

  पीएच. डी. (संस्कृत), नेट (संस्कृत), सेट (शिक्षणशास्त्र), एम.ए. (संस्कृत), एम.एड., राजपत्रित अधिकारी वर्ग १ (महाराष्ट्र शासन, भारत) (सहाय्यक प्राध्यापक - संस्कृत)

  २३१ समर्थ अलंकार, सदनिका क्र. २, कवितांच्या बागेसमोर, विठ्ठल रुक्मिणी मंदिराजवळ, ज्योतीनगर, छ. संभाजीनगर - ४०० ००५

  ई-मेल : dr.manjushak@gmail.com

  मोबाइल : + ९१ ९८२२८ ३९४९१ । व्हाट्सएप; +९१ ९०८२१ ६१५२४


**सध्या :**

- **प्रशासकीय अधिकारी, मुख्यमंत्री कार्यालय, मंत्रालय, मुंबई (महाराष्ट्र)** येथे राजपत्रित अधिकारी वर्ग १ म्हणून कार्यरत.
- महाराष्ट्र लोकसेवा आयोगामध्ये राज्यात सर्वप्रथम स्थान अधिगत आणि राजपत्रित अधिकारी वर्ग १ शासनसेवेमध्ये २२ वर्षांपासून कार्यरत.
- **संस्कृत सल्लागार मंडळाची सदस्य, साहित्य अकादमी, नवी दिल्ली. (https://sahitya-akademi.gov.in)**
- व्यापकदृष्ट्या मान्यताप्राप्त संस्कृत भाषातज्ज्ञ, **साहित्य अकादमी अनुवाद पुरस्कार २०२० प्राप्त,** उच्च शिक्षणातील शैक्षणिक विचारवंत, उच्च प्रशंसित कवयित्री, लेखिका, संशोधक आणि वक्ता.
- तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी लिखित ''वैदिक साहित्याचा इतिहास'' (२६० पृष्ठे) या **मराठी पुस्तकाचा (साहित्य अकादमी पुरस्कृत) संस्कृतमध्ये अनुवाद करण्याचा विशेष प्रतिष्ठेचा प्रकल्प** साहित्य अकादमीने प्रदान केला होता, जो पूर्णत्वाला जाऊन साहित्य अकादमीद्वारे अनुवाद प्रकाशित.
- आचार्य बाळाराव **सावरकर लिखित स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या चरित्राच्या (अंदाजे २००० पृष्ठांच्या) ४ खंडांचा अत्यंत सन्मानाचा संस्कृत अनुवाद प्रकल्प** स्वातंत्र्यवीर सावरकर राष्ट्रीय स्मारक, मुंबई यांनी स्वाधीन केला आहे. त्यापैकी प्रथम खंडाचा अनुवाद पूर्ण झालेला असून प्रकाशनाच्या मार्गावर.

- गेल्या २५ वर्षांपासून, भाषा, साहित्य, संस्कृती, कला, नाटक, शिक्षण आणि भाषेशी संबंधित विधायक कार्याचा प्रसार करण्याच्या ध्येयाने प्रेरित अन् कार्यरत आहे.
- संस्कृतच्या प्राध्यापिका, वसंतराव नाईक शासकीय कला आणि सामाजिक शिक्षण संस्था, नागपूर.
- **महाराष्ट्र शासनाच्या पहिल्या पूर्णवेळ महिला भाषा संचालक आणि महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोग, महाराष्ट्र शासनमध्ये प्रशासकीय अधिकारी** ह्या पदांवर कार्यभार सांभाळला.
- पुणे विद्यापीठातून पदवी आणि पदव्युत्तर शिक्षण पूर्ण केले
- तसेच पुण्यातील एसएनडीटी विद्यापीठामधून देखील बी.एड. आणि एम.एड. पूर्ण केले.
- एकाच वेळी पुणे विद्यापीठ आणि टिळक महाराष्ट्र विद्यापीठात अव्वल येण्याचा बहुमान मिळवला.
- MPSC वर्ग-एक परीक्षेमध्ये संस्कृत या विषयामध्ये सर्वप्रथम येण्याचा बहुमान
- विविध राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय परिषदा, चर्चासत्रे आणि परिसंवादांमध्ये अनेक शैक्षणिक शोधनिबंध सादर केले आणि अनेक प्रतिष्ठित पुरस्कार जिंकले.

**लक्षणीय योगदान :**

डॉ. मंजूषा या भाषा, कला, नाटक, संस्कृती, प्रशासन, साहित्य आणि शिक्षण या क्षेत्रांमध्ये अनेक बहुमुखी भूमिकांमध्ये योगदान देत आहेत. त्या संस्कृतमधील एक प्रसिद्ध प्राध्यापिका, एक प्रसिद्ध वक्ता, एक विचारशील प्रवचनकार, एक वाचक, एक उद्घोषक, एकल-कलाकार-नाट्यकलावंत/ सादरकर्त्या, एक कवयित्री, एक संशोधक, एक लेखिका आणि अशा अनेक क्षेत्रांमध्ये नैपुण्य असलेल्या विदुषी आहेत.

गेल्या काही वर्षांमध्ये डॉ. मंजूषा यांनी भाषिक संशोधन, अनुवाद, भाषा आणि कोशविकास आणि भाषा धोरणाची निर्मिती अशा अनेक महत्त्वपूर्ण क्रियाकार्यांचे नेतृत्व केले आहे. शिक्षण, साहित्य, प्रशासन आणि संस्कृती या

क्षेत्रातील त्यांच्या अद्भुत योगदानाबद्दल त्यांना अनेक पुरस्कार आणि सन्मानचिन्हांनी सन्मानित करण्यात आले आहे.

डॉ. मंजूषा यांनी मराठी कवितेच्या क्षेत्रात जागतिक स्तरावर विश्वविक्रमधारक अशी एक अनोखी ओळख निर्माण केली आहे आणि चरित्र, कविता, ललित आणि तात्त्विक तसेच वैचारिक लेखन अशा सर्व संबंधित शैलींमध्ये त्या एक उत्कृष्ट आणि प्रथितयश लेखिका म्हणून चमकत आहेत.

**प्रकाशमार्गा:** हे पुस्तक डॉ. प्रकाश बाबा आमटे यांच्या चरित्राचा (मराठी भाषेतील) डॉ. मंजूषा यांनी केलेला संस्कृत अनुवाद आहे ज्याला २०२० वर्षातील साहित्य अकादमीच्या अनुवाद पुरस्काराने गौरविले गेले. डॉ. आमटे यांच्या या अद्भुत जीवनप्रवासाचा संस्कृतमध्ये अनुवाद करण्यात डॉ. मंजूषा यशस्वी ठरल्या आहेत.

‘‘**साहित्यिक व्रत**’’ म्हणून गेल्या ६ वर्षांपासून, डॉ. मंजूषा रोज काव्यरचना रचत आहेत आणि प्रसारित करत आहेत. त्यानिमित्ताने मराठी कवितेतील ‘हाय रेंज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड’ मध्ये जागतिक विक्रम केल्याबद्दल महाराष्ट्राचे माजी राज्यपाल श्री. भगतसिंग कोश्यारी जी यांच्या हस्ते डॉ. मंजूषा यांचा सत्कार झाला आहे.

**प्रकाशित पुस्तके –**

- डॉ. मंजूषा यांनी मराठी, संस्कृत आणि इतर भाषांमध्ये अनेक उत्तम पुस्तके लिहिली आहेत आणि त्यांचे पहिले पुस्तक ‘विवाह संस्कार’ २०१० या वर्षी प्रकाशित झाले. त्यानंतर डॉ. मंजूषा यांनी संस्कृतमधील इतर अनेक पुस्तके प्रकाशित केली आहेत ज्यामध्ये श्यामस्य माता, विवेकानंदस्य विचारसौंदर्यम्, वेदकालीन स्त्रीरत्नानि, स्मृतिवचनानि, स्मृतिप्रतिपादित न्याय:, विवेकरत्नानि, प्रकाशमार्गा : अशी अनेक पुस्तके संस्कृतमध्ये रचली व अनुवादित केलेली आहेत. तर ‘प्राचीन भारतीय समाज’, ‘सूर्य शक्ती और मानव’, ‘कौटिलीय अर्थशास्त्र’, ‘स्मृतीग्रंथ – भाग १ और २’ ही त्यांची हिंदी भाषेतील पाच पुस्तके प्रकाशित झाली आहेत.

  त्यांच्या मराठीतील पुस्तकांमध्ये अनमोल विचार ठेवा – नचिकेता (लेखांचा संग्रह), लावण्यखणी (मराठी लावणी गाण्यांचा संग्रह), कणखरबाणा राणी

अहिल्या (अहिल्याबाई होळकर यांचे चरित्र), मृद्‌गंध (ग्रामीण मराठी भाषेतील कवितांचा संग्रह), एक पाती गवताची (ललित लेखसंग्रह), प्रीतसुधा, आरसपाणी-जीवनगाणी (मानवी जीवनावरील कवितांचा संग्रह), गोड-गोड पापा (बालकवितांचा संग्रह), सर्ग-निसर्ग, संतोष, उत्कर्ष, पूर्वा, सृष्टीगंध, युगंधरा (निसर्गावरील कविता), नाथा पंढरीनाथा, ईश भाग्येश (देवभक्तीपर), मंगेश, आंदण (प्रासंगिक), रूप-स्वरूप (राधाकृष्ण), अलवार, मधुश्री (ऋतू), सुधांशु (चंद्र), दिव्यांतरी (सूर्य), बकुळफुले, अळुमाळु, सुरभी, कामिनी (फुलांवरील कविता), खाणाखुणा (पशु), वैष्णवी (पक्षी), नादश्रुती, श्वेता (तिच्यावरील प्रीत कविता), स्वामिनी (स्त्रीजीवन - भाग १), मृणालिनी (स्त्रीजीवन - भाग २), प्रमिला (धरती-आकाश), लाघव वेळा (सकाळ-संध्याकाळ), मनमंदिरा, तेजशलाका, उदय, मंजुभारती (जीवनपर कविता), प्रियतमा शुभांगी, नेहा, सुधीर (त्याच्यावरील प्रीत कविता), मन्मनी, इंदुमती, मंजुश्री, मानसी (ललितलेख), बोल बरवे, मनस्विनी, हृदयस्पर्शी (रसिक प्रतिक्रिया - कवीश्वर), प्रतिसाद, रसिकवरा, हृदयतरंग, अनुबंध (अन्य रसिक प्रतिक्रिया), गंधराणी (मिश्र कविता), यांचा समावेश आहे.

याशिवाय विज्ञानातील संस्कृत, स्मृती धारा भाग-१ आणि भाग २, चतुरंग, शोधामृत, संस्कृत मराठी उखाणे, गौरवगाथा सूर्याची, जीवनचिंतन, भावमंजूषा, विचारकणिका, वेदकालीन स्त्रीरत्ने आणि अणुविज्ञानातील झंझावात - डॉ. अनिल काकोडकर, प्राचीन भारतीय समाज. ही पुस्तके देखील प्रकाशित आहेत. त्यांचे मराठीमध्ये 'मंजु मंजिरी' आणि 'सर्ग निसर्ग' नावाने ऑडिओ कवितासंग्रहही प्रकाशित झालेले आहेत.

**प्रकाशनाच्या वाटेवरील पुस्तके -**

(राधाकृष्ण) - श्रीरंग, कृष्णकांत, (वेळा) - तेव्हा, (मिश्र कविता) - कवडसा, मृण्मयी, अबोली, (ऋतू) - सहा सोहळे, नभ मोजताना, (पाऊस कविता) - श्रावणी, (गझल) - उल्का, (वाट) - जरा रेंगाळले, (रंग) - रंगतनु, (सर्वोत्कृष्ट कविता) - माझी कविता.

**मिळालेले पुरस्कार :**

**पुरस्काराचे नाव आणि वर्ष –**

- कोकण मराठी साहित्य परिषदेचा अत्यंत मानाचा २०२२-२३ चा ललित गद्य विभागातील द्वितीय क्रमांकाचा सौ. लक्ष्मीबाई व राजाभाऊ गवांदे पुरस्कार 'एक पाती गवताची' या ललितलेखसंग्रहास प्राप्त झाला आहे.
- शिक्षाश्री सन्मान – २०२४
- स्व. वा.ना. उत्पात स्मृती पुरस्कार – २०२३
- परळी भूषण पुरस्कार २०२३
- मुंबई मराठी ग्रंथ संग्रहालय २०२३ पुरस्कार (गौरव गाथा सूर्याची साठी)
- संस्कृत भाषा सभा नाशिक, महाराष्ट्र तर्फे डॉ. व्ही. एम. गोगटे स्मृती पुरस्कार २०२३
- अखिल ब्राह्मण मध्यवर्ती संस्था, नाशिक २०२२ तर्फे सन्मान आणि सत्कार
- अखिल देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण मध्यवर्ती मंडळ, वडोदरा तर्फे ''साहित्य रत्न'' पुरस्कार २०२२
- सरस्वतीदेवी विद्या विकास ट्रस्ट पुरस्कार २०२२
- प्रेमचंद सन्मान २०२२
- अणुविज्ञानातील झंझावात : डॉ. अनिल काकोडकर – ३ राज्यस्तरीय पुरस्कार प्राप्त
- महात्मा फुले राज्यस्तरीय बाल-साहित्य पुरस्कार (महाराष्ट्र साहित्य प्रतिष्ठान) २०२१
- राज्यस्तरीय संत नामदेव चरित्र साहित्य पुरस्कार २०२०
- लेखक सुनील रंगराव देसाई राज्यस्तरीय बाल-साहित्य पुरस्कार २०१९
- संस्कृतसाठी साहित्य अकादमी अनुवाद पुरस्कार २०२०
- राष्ट्रपती पुरस्कार विजेते दिवंगत व्ही.डी. सर्जे गुरुजी प्रतिष्ठानचा जीवन गौरव पुरस्कार २०१८

- पत्रकार उत्कर्ष समिती (मुंबई)चा राज्यस्तरिय आदर्श शिक्षक पुरस्कार २०२७
- शेतकरी शिक्षण प्रसारक मंडळ आष्टी जि. बीड (महाराष्ट्र) चा राज्यस्तरीय आदर्श पुरस्कार
- द्वारका प्रतिष्ठानचा राज्यस्तरीय सर्वोत्कृष्ट प्रशासक पुरस्कार
- गोस्वामी संत तुलसीदासकृत रामचरित मानस पुरस्कार २०२६
- राज्यस्तरीय दैनिक भास्कर महिला पुरस्कार २०१२
- राज्यस्तरीय लोकमत सखी सम्राज्ञी पुरस्कार २०१२
- दिल्ली संस्कृत अकादमी, अखिल भारतीय-नवोदित - संस्कृत कवि प्रतियोगिता पुरस्कार २०१२
- लोकमत माझी आई पुरस्कार २०१२
- राज्यस्तरीय महिला गौरव पुरस्कार २०११
- संस्कृत नाट्य महोत्सव - संहितालेखन प्रथम पारितोषिक २०११
- संस्कृत नाट्य महोत्सव - नाट्य द्वितीय पारितोषिक २०११
- राज्यस्तरीय विद्यारत्न पुरस्कार २०११
- राज्यस्तरीय विद्यारत्न पुरस्कार २०१०
- S.N.D.T. महिला विद्यापीठ, सर्वतृतीया २००१
- मध्यप्रदेश संस्कृत अकादमी राष्ट्रीय निबंध रचना पुरस्कार १९९८
- महाराष्ट्र राज्यशासन संस्कृत प्राविण्य पुरस्कार १९९८

- **Digital Content :**

| अ.क्र. | तपशील | लिंक |
|---|---|---|
| १ | सखी सह्याद्री<br>मुलाखत,<br>दि. १०-१०-२०२४ | https://www.facebook.com/share/v/FmEuAjAVeKGrunYB/?mibextid=WC7FNe |
| २ | सोनाली नवांगुळ, डॉ. मंजूषा कुलकर्णी यांना साहित्य अकादमीचा अनुवादासाठी पुरस्कार | https://www.loksatta.com/pune-news/sonali-nawangul-dr-manjusha-ku-lakarni-sahitya-akademi-award-for-translation-akp-94- 2600116 ?utm_source =whatsapp_web & utm_medium =social& utm_campaign=socialshare buttons |
| ३ | "आपल्यालाच आपला प्रकाश होता आलं पाहिजे." साहित्य अकादमीचा पुरस्कार मिळाल्या नंतर मंजुश्री यांनी दिलेला हा संदेश आपल्या सर्वांसाठी साहित्य अकादमी पुरस्कार विजेत्या डॉ. मंजूषा कुलकर्णी MaxWoman वर. | https://youtu.be/Lqu-YF4G-rw |
| ४ | डॉ. मंजूषा कुलकर्णी यांना साहित्य अकादमी पुरस्कार | https://www.madhyamvruttseva.com/डॉ-मंजूषा-कुलकर्णी-यांचा/ |

| | | |
|---|---|---|
| ५ | महाराष्ट्राचे माननीय<br>राज्यपाल यांचे ट्वीट | <https://twitter.com/mah<br>a_governor/status/<br>@maha_governor<br>1439559856764030979<br>?s=08<br><https://twitter.com/mah<br>a_governor/status/143955<br>9859536482304?s=08 |
| ६ | संस्कृत भाषाव्रताचा सन्मान<br>‘प्रकाशवाटा’ या डॉ. प्रकाश<br>आमटे यांच्या आत्मचरित्राचा<br>संस्कृत अनुवाद<br>डॉ. कुलकर्णी<br>यांनी ‘प्रकाशमार्गा:’ | https://www.loksatta.com<br>//lokrang/sahitya-<br>akademi-award-for-<br>translation-autobiography-<br>of-prakash-<br>amte-poet-prof-dr-<br>manjusha-kulkarni-<br>prakashwata-zws-<br>70-2612674/lite/<br>?utmsource=whatsapp_<br>web&utm_medium=social&<br>utm_campaign=socials<br>harebuttons |
| ७ | https://mr.wikipedi<br>a.org | https://mr.wikipedia.org/<br>wiki/मंजूषा_कुलकर्णी |
| ८ | प्रा.डॉ. मंजूषा कुलकर्णी<br>यांचा महाराष्ट्र राज्याच्या<br>मा. राज्यपालांच्या हस्ते<br>अभिनव साहित्यिक विक्रम<br>केल्याबद्दल सत्कार | https://youtu.be/<br>6x7BRzz_seo |

| | | |
|---|---|---|
| ९ | प्रशासक आणि संस्कृत विद्वान - डॉ. मंजूषा कुलकर्णी यांच्याशी भेट (डीडी न्यूजद्वारे) | https://youtu.be/7a5dNUZKnRk |
| १० | @MahaGovtMic | https://twitter.com MahaGovtMic/status 1476551366352924672?s=08 |
| ११ | कवयित्री डॉ.मंजूषा कुलकर्णी यांचा जागतिक काव्य विक्रम केल्याबद्दल राज्यपालांच्या हस्ते सत्कार 'साहित्यिक व संतांनी देश एकसूत्रात बांधला' भगतसिंह कोश्यारी | https://twitter.com/InfoVidarbha/status/1418559733921816580?s=20 |
| १२ | साहित्याच्या पारावर डॉ. मंजूषा कुलकर्णी सखी सह्याद्री - डीडी सह्याद्री दूरदर्शन मुंबई | https://youtu.be/VEJcY4GX7tg |
| १३ | सखी सह्याद्री | <https://youtu.be/ITLxInwuJc ; https:/youtu.be/7a5dNUZKnRk |
| १४ | खास कार्यक्रम / नवदुर्गासह डॉ.मंजूषा कुलकर्णी / नवरात्री स्पेशल / सकाळ मीडिया | https://youtu.be/m1Ot_LzxI4k |

| | | |
|---|---|---|
| १५ | मनीषा नवपुते यांची फेसबुक पोस्ट | https://m.facebook.com/story.php?story_fbid=1266533350529198id=100015176343763&sfnsn=wiwspwa |
| १६ | संजीव खानझोडे यांची फेसबुक पोस्ट | https://m.facebook.com/story.php?story_fbid= 4429100480484776 id=100001546044035 sfnsn=wiwspwa |
| १७ | ऑडिओ अल्बम – ''सर्ग_निसर्ग'' ऑडिओ अल्बम – ''मंजुमंजिरी'' | <https://vy6s8.app.goo.gl/NKnJ> https://vy6s8.app.goo.gl/A8Z5 |
| १८ | Special Screening of 100th Episode of Mann Ki Baat from Raj Bhavan | https://www.youtube.com/live/7-dyWQaLA?si=mid7qSf_HIM6WQ8q |
| १९ | स्वामी विवेकानंद व्याख्यान : भाग – १ | https://youtu.be/TrNMBV_ysf8?feature=shared |
| २० | स्वामी विवेकानंद व्याख्यान : भाग –२ | https://youtu.be/NpvMk-Pu4dOs?si=typfHtOvNg-1hDXgT |

**सारांश :**

- एकूण अनुभव (शैक्षणिक) : २२ वर्षे
- एकूण अनुभव (प्रशासकीय) : १३ + वर्षे
- व्याख्याने आणि भाषणे : १००० पेक्षा जास्त
- प्रवचने : ५०० हून अधिक
- शोधनिबंध प्रकाशित : १०० हून अधिक
- स्वलिखित पुस्तके (प्रकाशित) : ८९
- स्वलिखित पुस्तके (आगामी) : १४
- संशोधन प्रकाशने : १६
- परिषद / सेमिनार / कार्यशाळेत सहभाग (आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय आणि राज्यस्तरीय) : ४०
- परिषद / सेमिनार / कार्यशाळेत स्रोत-व्यक्ती / तज्ज्ञ म्हणून सहभाग : २०० हून अधिक
- पुरस्कार : २०० पेक्षा जास्त
- मिळालेल्या शिष्यवृत्ती : ९
- डॉ. मंजूषा यांच्या मार्गदर्शनात पीएच.डी. पदवी प्राप्त विद्यार्थी : ०५
- डॉ. मंजूषा यांच्या मार्गदर्शनात पीएच.डी. संशोधन कार्य सुरू असलेले विद्यार्थी : ०४

• • •